पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, ऑगस्ट २०२५, खंड २४, अंक ५, पृष्ठे ६०

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ■ प्रश्नचिन्ह

७ ■ पर्यावरणीय बदल आणि शहरांचे व्यवस्थापन

१३ ■ वाढता वाढता वाढती कर्जांचे डोंगर...

१९ ■ 'दुर्मीळ'चा नेमका अर्थ काय?

२५ ■ सोन्याच्या प्रेमात आता मध्यवर्ती बँकाही!

**जिकडे-तिकडे**

३४ ■ (१) नव्या पिढीसाठी आरोग्य वरदान!

३७ ■ (२) आत्मनिर्भर अवकाश युगाची सुरुवात!

**उजळणी**

४२ ■ (१) : लीळाचरित्र : महात्माधर्माचे आचाररूप चित्र

४९ ■ (२) : ''राजकीय पक्षांनी स्वत:च्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.''


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/– रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. **त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.
वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : ०२०-२५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेल : ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड २४ (अंक ५)**
**ऑगस्ट २०२५**
**संपादक – अभय टिळक**
**सहयोगी संपादक – पराग पोतदार**

- **अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?**
- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

## अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी अनेक माहिती संदर्भासह पुरविणे.**

***अर्थबोधपत्रिका कशी साकारते?***

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याल अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि / किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# प्रश्नचिन्ह

ज्या प्रश्नांना लगोलग काहीही उत्तरे आज कोणापाशीही नाहीत, अशा काही प्रश्नांच्या अंगोपांगांचा वेध घेण्याचा प्रयत्न 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात केलेला आहे. पर्यावरणीय बदलांपायी हवामानामध्ये आणि मुख्यत: पर्जन्यचक्रामध्ये घडून येत असलेल्या अनाकलनीय व अतर्क्य बदलांचा अनुभव आपण सगळेच घेत आहोत. या बदलांचा सगळ्यांत सघन आणि गंभीर फटका बसतो आहे जगभरातील शहरांना. ऑगस्ट महिन्याच्या उत्तरार्धात संपूर्ण महाराष्ट्राला ओलेचिंब करून टाकणाऱ्या मुसळधार पर्जन्यधारांनी लहान-मोठ्या शहरांची जी दाणादाण उडवून दिली, ती आपण सगळ्यांनीच हतबलतेने सोसली. लोकसंख्येचे अप्रतिहत केंद्रीकरण होत राहण्याने अस्ताव्यस्त फुगत चाललेल्या शहरांचे व्यवस्थापन किती व कसे दुष्कर बनत चाललेले आहे, याची चुणूक त्या त्रेधातिरिपिटीद्वारे स्पष्टपणे दिसली. पर्यावरणीय बदलांपायी येत्या काळात नागरी जीवनव्यवहारांना जी अनेकांगी झळ सोसावी लागणार आहे, तिच्या निराकरणाचा कोणताही आराखडा आज आपल्यापाशी नाही. मुळात, शहरांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी ज्यांच्या शिरावर आहे अशा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच आजघडीला दुर्बळ झालेल्या आहेत. त्यांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाचे नीलचित्रदेखील आज कोणापाशी नाही. त्यांमुळे, दरवर्षी बरसणाऱ्या जोरदार सरींपायी रस्तोरस्ती तुंबणारे पाणी, सखल वस्त्यांमध्ये पुराचे पाणी घुसून उडणारा हाहाकार, वाहतूक कोंडी, घरे-माणसे-जनावरे वाहून जाण्याने होणारी प्राणहानी आणि वित्तहानी... अशा सगळ्या आकांतांवर तेवढ्यापुरती जुजबी मलमपट्टी करून आपण वेळ मारून नेतो. परंतु, त्यांपायीच या समस्यांचे स्वरूप दिवसेंदिवस अधिकाधिक गुंतागुंतीचे आणि सखोल बनत आहेत. मग, ती जटिलता हलकी करण्यासाठी अधिक ताकदीची गरज भासते आणि अशक्त बनलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था अधिकच निष्प्रभ ठरत जातात. शहरी व्यवस्थांचे मजबुतीकरण

घडवून आणण्यात प्रशासनिक, तंत्रज्ञानात्मक, मनुष्यबळविषयक, कायदेसंलग्न अडचणी तर आहेतच परंतु, सगळ्यांत चिवट समस्या आहे ती निधीची. शहरी स्थानिक स्वराज्य संस्था निधीपुरवठ्याच्याबाबतीत सर्वस्वी परावलंबी आहेत. त्यांची वित्तीय प्रकृती धडधाकट नसल्याने खुल्या बाजारात कर्जरोखे विक्रीस काढून पैसा उभारण्याचा पर्यायही हद्दपार होतो. अर्थात, कारणपरत्वे काढलेली कर्जे, यथावकाश, फेडायची कशी हा नवीनच प्रश्न त्यांतून निर्माण होतो हेही तितकेच खरे. आज जगभरात सर्वत्रच शासनसंस्था, कॉर्पोरेट उद्योग, लहान-मोठे व्यावसायिक आणि कुटुंबसंस्था अशा सगळ्यांच समाजघटकांच्या माथ्यावर कर्जांचे ढीग साचलेले आहेत. कर्जांचा हा भार हलका कसा करायचा, या प्रश्नाने या सगळ्या घटकांना आज अक्षरश: भंडावून सोडलेले आहे. हा प्रश्नदेखील सहजासहजी सुटणारा नाही. कर्जे थकायला लागली की बँकाही अडचणीत येतात. नव्याने कर्जवाटपाची त्यांची शक्ती क्षीण बनते. कर्जे बुडण्याने आणि/अथवा ती माफ केली जाण्याने बँकांच्या भांडवली पायाला कसर लागते. सर्वसामान्य माणसाप्रमाणेच बँकांनादेखील त्यांच्या


## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

राखीव निधीचे बाळसे टिकवून धरण्याबाबत दक्ष राहणे भाग असते. वेगळ्या पातळीवर, प्रत्येक देशातील मध्यवर्ती बँकेलादेखील तिच्या राखीव गंगाजळीचे आकारमान आणि मूल्य बुलंद राखण्याचे उत्तरदायित्व कसोशीने पार पाडावे लागते. देशी–विदेशी अर्थकारणात ज्या प्रमाणात अस्थिरता वाढेल त्या प्रमाणात मध्यवर्ती बँकांना त्यांच्या राखीव निधीच्या संरक्षणाचे व्यवस्थापन डोळ्यांत तेल घालून करणे भाग पडते. आपल्या जवळील राखीव निधी मध्यवर्ती बँका निरनिराळ्या पर्यायांमध्ये गुंतवत असतात. सरकारी कर्जरोखे, अमेरिकी डॉलरसारखे परकीय चलन, सोने यांमध्ये बँका त्यांचा निधी गुंतवतात. ज्या प्रमाणात आर्थिक अस्थैर्याची कमान चढती राहते त्या प्रमाणात गुंतवणुकींचे मूल्य शाबूत राखण्याचे आव्हान कडवे बनत जाते. अशा परिस्थितीत, मध्यवर्ती बँका, मग, सोनेखरेदीकडे आपला मोहरा वळवतात. देशोदेशींच्या मध्यवर्ती बँका आजघडीला नेमके तेच करत आहेत. ठिकठिकाणची युध्यमान परिस्थिती आणि अमेरिकेने जगाविरुद्ध पुकारलेले एकतर्फी व्यापारशुल्क–युद्ध यांमुळे वैश्विक अर्थकारणात प्रगाढ अनिश्चितता सर्वत्र भरून राहिलेली आहे. ती कधी ओसरेल ते सांगता येत नाही. या व्यापारयुद्धात अमेरिकेचा मुख्य रोख राहिलेला आहे तो चीनवर. ट्रम्प यांच्या चढाईखोर पवित्र्याला तितकाच सज्जड जबाब देण्यासाठी चीनने हाताशी राखलेले अमोघ शस्त्र म्हणजे दुर्मीळ खनिज घटकांचे उत्पादन व पुरवठा. या दुर्मीळ खनिज घटकांना, मुळात ‘दुर्मीळ’ असे का म्हणले जाते याचा उलगडा करण्याचा प्रयत्न या अंकातील एका लेखात करण्यात आलेला आहे. अमेरिका आणि चीन या दोघांच्या साठमारीचे हे पर्व कधी व कोणत्या बिंदूवर कसे मावळेल याचा काहीही अंदाज आज नाही. सहजासहजी आणि लगोलग अशी उत्तरे ज्या प्रश्नांना नाहीत अशा या प्रश्नांच्या काही पैलूंचा उहापोह ‘अर्थबोधपत्रिके’च्या या अंकात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या अंकातील ‘उजळणी’ विभागाचे अंतरंग ‘अर्थबोधपत्रिके’च्या कुटुंबातील सदस्यांना वैशिष्ट्यपूर्ण वाटावे. अतिशय सकस अशा विचारप्रवण गद्याची निर्मिती प्राकृतामध्ये घडवत मऱ्हाटी भाषेला ज्ञानभाषा बनविण्याच्या संदर्भात ज्या महानुभाव संप्रदायाने पायाभूत योगदान दिले त्या महानुभाव संप्रदायाचे संस्थापक–प्रवर्तक महात्मा चक्रधरस्वामी यांची जयंती यंदाच्या २५ ऑगस्ट रोजी साजरी झाली. चक्रधरस्वामींच्या उद्‌बोधक अशा लीलांचे संकलन असणाऱ्या ‘लीळाचरित्रात’ उमटलेल्या तत्त्वबोधाचे दर्शन प्रगट करणारा ज्येष्ठ समीक्षक आणि संतविचारांचे चिकित्सक विश्लेषक प्रा. व. दि. कुलकर्णी यांचा लेख म्हणूनच ‘उजळणी’ विभागात

आवर्जून पुनर्प्रकाशित केलेला आहे. सश्रद्ध चिकित्सेचा जणू आदर्श वस्तुपाठ ठरावा, असेच त्या लेखाचे अंतरंग आहे. तर, १५ ऑगस्ट रोजी साजऱ्या होणाऱ्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य ध्यानात घेऊन 'घटना'कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेच्या अंतिम बैठकीत केलेल्या विवेचनाचा संपादित अंशही 'उजळणी'मध्ये आवर्जून सादर केलेला आहे. महत्प्रयासाने पदरात पाडून घेतलेले स्वातंत्र्य चिरंतन राहण्यासाठी सार्वजनिक जीवनात कोणती पथ्ये पाळली जाणे अत्यावश्यक आहे, यांबाबत बाबासाहेबांनी त्या विवेचनादरम्यान व्यक्त केलेले विचार आजही किती यथार्थ व प्रस्तुत शाबूत होतात, त्याची प्रचिती त्यांवरून यावी. प्रजासत्ताक राज्यव्यवस्था आणि स्वातंत्र्य ही दोन मूल्ये कशी व किती परस्परपूरक आणि परस्पराश्रयी ठरतात, याचे बाबासाहेबांनी केलेले मर्मग्राही विश्लेषण केवळ अपूर्व असेच आहे. महात्मा चक्रधरस्वामी आणि महामानव डॉ. आंबेडकर यांच्या विचारधनाचे पाथेय आपल्याला सतत जीवापाड जपणे कसे अगत्याचे ठरते त्याची स्पष्ट कल्पना येण्यास ही 'उजळणी' हातभार लावेल, इतकीच माफक अपेक्षा!


## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

### नियामक मंडळ

१. **प्रा. डॉ. एस. श्रीरामन** (अध्यक्ष)
२. **प्रा. डॉ. रवींद्र ढोलकिया**
३. **प्रा. डॉ. सुरिंदरसिंग जोधका**
४. **डॉ. रमानाथ झा**
५. **प्रा. डॉ. सुहास पळशीकर**
६. **प्रा. डॉ. अंजली राडकर**
७. **श्री. अभय टिळक** (मानद संचालक)

# पर्यावरणीय बदल आणि शहरांचे व्यवस्थापन

शहरांचे व्यवस्थापन हा जगभरात सगळीकडेच अतिशय अवघड बनत चाललेला विषय आहे. वेगाने होणारे शहरीकरण, अस्ताव्यस्त वाढणारी शहरे, लोकसंख्येचे मोठ्या शहरांमध्ये अव्याहत जारी असलेले केंद्रीकरण, शहरी जमिनींचा सतत वाढणारा सघन वापर, त्यांपायी शहरी लोकसंख्येची फुगत जाणारी घनता, चांगल्या शहरी निवाऱ्याचा भयाण तुटवडा, शहरोशहरी विस्तारणाऱ्या झोपडवस्त्या...अशा सगळ्या गतिमान वास्तवाला सामोरे जाताना शहरी व्यवस्थापनाची आता अक्षरश: त्रेधातिरपिट उडते आहे. नागरी विभागांचे, आणि त्यांतही पुन्हा, मोठ्या शहरांचे व महानगरांचे व्यवस्थापन अधिकच कसोटीचे बनण्यास आता आणखी एक घटक हातभार लावतो आहे आणि तो म्हणजे पर्यावरणीय बदलांचा. अतोनात प्रदूषण आणि बेसुमार वृक्षतोड यांपायी पृथ्वीच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीने वाढते आहे. त्यांपायी घडून येत असलेल्या पर्यावरणीय बदलांचे फटके नाना स्वरूपांत आता बसत असल्याचे आपण अनुभवतो आहोत. प्रचंड पाऊस अथवा अवर्षण, चक्रीवादळे आणि उष्णतेच्या लाटा, अवचितच येणारे महापूर, मोसमी वाऱ्यांचे बदललेले चक्र, त्यांमुळे अनियमित बनत चाललेला मोसमी पाऊस, लहरी बनलेला पावसाळा, पाऊस एक तर उशीरा सुरू होणे किंवा पावसाळा लांबणे, पावसाळा सुरू झाल्यानंतर काही भूभागांवर पर्जन्यवृष्टी व्यवस्थित होने तर काही भागांकडे पाऊस अजिबातच न फिरकणे, पाऊस वेळापत्रकानुसार सुरू होणे परंतु, एकदम मधेच पावसाने प्रदीर्घ काळ दडी मारणे... अशांसारख्या पर्यावरणीय घटनांची वारंवारता, सघनता आणि सखोलता उत्तरोत्तर अधिकाधिक तीव्र बनत चालल्याचे आपण बघतो आहोत.

या बदलांचे शहरी जीवनावर घडून येत असलेले परिणामही निरनिराळे शाबीत होतात. शहरांमधील वाढती बांधकामे, त्यांपायी होणारी झाडांची कत्तल, वाहनांची फुगणारी संख्या अशांसारख्या बाबींपायी शहरी हवेची पातळी दिवसेंदिवस

अधिकाधिकच खालावते आहे. चौफेर वाढत असलेल्या बांधकामांपायी तसेच शहरांमधील रस्त्यांच्या आखणीद्वारे अधिकाधिक भूभाग एकतर सीमेंट अथवा डांबराच्या आच्छादनाखाली येतो आहे. परिणामी, पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याचे प्रमाण घटत जाते आहे. या वास्तवाचे दुष्परिणाम दुहेरी दिसतात. एक तर, शहरी भूगर्भातील पाण्याचा उपसा एकीकडे प्रचंड वाढत असताना पावसाचे पाणी मुरण्याचे प्रमाण दुसरीकडे घटत चालल्याने शहरी भूभाग एकाएकी खचण्याच्या घटना वाढत आहेत. दुसरीकडे, वरून पडणारे पावसाचे पाणी जमिनीत न मुरल्याने पृष्ठभागावरून वाहायला लागते आणि त्यांमुळे शहरी सखल भागांत तलावसदृश परिस्थिती निर्माण होते. रस्तोरस्ती पाणी तुंबल्याने वाहतूक कोंडी ही पावसाळ्यातील नित्याची बाब ठरते आहे. त्यांतच, शहरांमधील अनिर्बंध वाढणाऱ्या झोपडपट्ट्या आणि अनधिकृत बांधकामे यांमुळे नैसर्गिक नाले आणि ओढे बुजवले जाऊन पावसाच्या पाण्याचा निचरा घडून येण्याच्या वाटा निरुंद बनत आहेत. त्यांमुळे, अगदी थोड्या काळात मुसळधार पाऊस झाला की, ओढे आणि नाले यांतून वाहणाऱ्या प्रवाहांचे फुगवटे नजीकच्या भूभागांत पसरतात आणि ते भाग जलमय बनतात. शहरांमध्ये दरदिवशी निर्माण होणाऱ्या टनावारी घनकचऱ्याचे व्यवस्थापन आणि प्रक्रिया कार्यक्षमपणे न होण्याने अशा पूरस्थितीसदृश काळात भिजलेल्या कचऱ्यापायी आरोग्याच्याही नानाविध समस्या उभ्या ठाकतात.

मोठ्या शहरांमध्ये आणि महानगरांत औद्योगिक गुंतवणूक, व्यवसायाच्या संधी, रोजगाराचे पर्याय यांचे केंद्रीकरण अव्याहत होत आहे. परिणामी, मोठ्या महानगरांकडे वाहणारे स्थलांतरितांचे लोंढेही प्रत्यही वाढत आहेत. साहजिकच, शहरी निवाऱ्याची मागणीदेखील सतत वाढते आहे. त्यांमुळे शहरांमधील बांधकामांची संख्या वाढण्याबरोबरच इमारतींची रचनादेखील बदलते आहे. शहरे उभी वाढत आहेत. जुनी बांधकामे पाडून तिथे बहुमजली इमारती उठवण्याला सगळ्यांच मोठ्या शहरांमध्ये जोर येतो आहे. सतत चालू असणारी पाडापाडी आणि नवीन इमारतींची बांधकामे यांपायी शहरी हवेची गुणवत्ता वेगाने ढासळत जाते. पडणाऱ्या इमारतींची हवेत उडणारी धूळ, सीमेंटचे सूक्ष्म कण यांपायी शहरी हवा कमालीची प्रदूषित होते. परिणामी, शहरवासियांच्या, आणि मुख्यत: लहान मुलांच्या, श्वसनव्यवस्थाविषयक तक्रारी व आजारांचे प्रमाण चढती कमान दाखवते. शहरांमधील वाहनांच्या वाढत्या संख्येपायी हवाप्रदूषण अधिकच सघन बनते. वाहनांमधून बाहेर सोडला जाणारा धूर आणि वाहनांच्या चाकांचे रबर व रस्त्याचा पृष्ठभाग यांच्या घर्षणाद्वारे हवेत सोडले

जाणारे रबराचे अतिसूक्ष्म कण हे शहरी हवेचे निकृष्टीकरण अधिक तीव्र बनवते. बेसुमार अनियमित बांधकामे आणि लोकसंख्येचे वाढते केंद्रीकरण शहरांच्या परिसरातील टेकड्या, पाणथळ जागा, नैसर्गिक तलाव, बागा व उद्याने यांचे आकारमान एकतर आक्रसते आहे अथवा अतिक्रमणांपायी त्यांचा श्वास कोंडतो आहे. बांधकामांपायी केली जाणारी वृक्षतोड भरून काढेल इतक्या मोठ्या प्रमाणावर नव्याने वृक्षारोपण होत नसल्याने प्रदूषित हवेचे शुद्धीकरण घडवून आणणारी शहरांची नैसर्गिक फुपफुसे कोंडलेली राहतात.

हे असे वास्तव आपण सगळेच अलीकडील काळात अनुभवतो आहोत. पर्यावरणीय बदलांपायी शहरी समस्यांना एक नवीनच आयाम आता जोडला जातो आहे. त्याचा परिणाम, आपातत:, शहरी व्यवस्थापनावरही जाणवणे अपरिहार्य ठरते आहे. मुळातच जटिल बनलेल्या शहरी व्यवस्थापनापुढे पर्यावरणीय बदलांपायी आव्हानांची जी जंत्री नव्याने उभी ठाकते आहे त्यांचा सामना समर्थपणे करण्यास शहरी प्रशासन आजघडीला पुरेसे सक्षम आहे अथवा नाही, हे एक मोठे प्रश्नचिन्हच आहे. सगळ्या जगातच ही परिस्थिती आज दिसते. त्यांतही पुन्हा, लोकसंख्येच्या आकारमानानुसार मांडलेल्या शहरांच्या उतरंडीमध्ये निम्न स्तरांवर असणाऱ्या नागरी विभागांची स्थिती तुलनेने अधिकच दोलायमान बनते. कारण, नव्याने उद्भवत असणाऱ्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक असलेली संसाधने आणि साधनसामग्री उभी करण्याची मोठ्या शहरांची ताकद तुलनेने लहान आकारमानाच्या शहरांपेक्षा अधिक असावी, हे स्वाभाविक ठरते. विशेषत:, भारतासारख्या देशामध्ये जिथे नागरीकरणाच्या विकास-विस्तारात सर्वस्तरीय असमानता घाऊक प्रमाणावर नांदते आहे तिथे तर हे आव्हान अधिकच कडवे बनत जाते. पर्यावरणीय बदलांपायी शहरांच्या व्यवस्थापनाच्या संदर्भात स्थानिक स्वराज्य संस्था आज ज्या मर्यादांना सामाऱ्या जात आहेत त्यांचा परिचय करून घेणे म्हणूनच केवळ रोचकच नव्हे तर, अभ्यसनीयही बनते.

पर्यावरणातील बदलांपायी शहरांच्या व्यवस्थापनाच्या पुढ्यात जी आव्हाने उभी ठाकत आहेत त्यांचा सामना करण्याची क्षमता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ठायी पुरेशा प्रमाणात आहे किंवा नाही, हा इथे या संदर्भात अतिशय संवेदनशील प्रश्न ठरतो. जगभरात अनेक ठिकाणी या बाबत आता चर्चा आणि विचारविनिमय चालू आहे. भारतही त्याला अपवाद नाही. आपल्या देशातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या बाबतीतील मर्यादा नेमक्या कोणत्या आहेत, त्या मर्यादांवर

मात करण्याच्या दिशा कोणत्या याबाबत तज्ज्ञांची काय मतमतांतरे आहेत ते जाणून घेणे आता आवश्यक ठरत जाणार आहे. निरनिराळ्या प्रकारे घडून येत असलेल्या पर्यावरणीय बदलांना सामोरे जात त्यांना सक्षम व उचित प्रतिसाद देण्यात आपल्या देशातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना येणारे अडथळे, ढोबळ मानाने, एकूण चार प्रकारचे दिसतात. संस्थात्मक, कार्यकक्षाविषयक, वित्तीय आणि तंत्रज्ञानात्मक अशा चार प्रकारांत त्या अडथळ्यांचे वर्गीकरण करता येईल अथवा केले जाते. या चार वर्गांतील अडथळ्यांचा काही एक तपशील जाणून घेणे गरजेचे ठरते.

भारतीय राज्यघटनेमध्ये १९९२-९३ या वर्षात घडवून आणलेल्या अनुक्रमे ७३व्या आणि ७४व्या घटनादुरुस्तीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांना सत्तेचा तिसरा स्तर म्हणून घटनात्मक अधिमान्यता प्राप्त झाली. केंद्रीय सत्ता, राज्य स्तरावरील सत्ता आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रूपाने अगदी तळात नांदणारा सत्तेचा विकेंद्रीत तिसरा स्तर अशी ही रचना तत्वश: अंगीकारली गेलेली असली तरी, व्यवहारात मात्र आजही सत्तेचे अनुक्रमे केंद्र आणि राज्य स्तरांवर केंद्रीकरणच अनुभवास येते, असे या क्षेत्रातील अभ्यासकांचे अनुभवसिद्ध संशोधन सांगते. शहरी स्थानिक समस्यांवर परिणामकारक उपाययोजना जलदीने अमलात आणण्यासाठी आवश्यक असणारे नियोजन व नियोजित उपाययोजना कार्यवाहीत आणण्यासाठी गरजेची असलेली निर्णयक्षमता यांपासून शहरी स्थानिक स्वराज्य संस्था आजही वंचितच आहेत. सगळ्यांत मोठी अडचण आहे ती अशी की, शहरी पर्यावरणाचे संगोपन व संतुलन राखण्याच्या दिशा स्पष्ट करणारे शहरी पर्यावरण धोरणच मुळात आपल्या देशात अस्तित्त्वात नाही. दिवसेंदिवस खालावणारी शहरी पर्यावरणाची सरासरी पातळी सावरण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी सक्षमपणे हाताळण्यासाठी गरजेच्या असणाऱ्या व्यवस्था तसेच केवळ त्याच कामाला वाहून घेतलेल्या संस्थात्मक यंत्रणाच आज नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांपाशी नाहीत, ही सगळ्यांत मोठी व गंभीर समस्या आहे.

अगदी केंद्रातदेखील फारसे वेगळे चित्र दिसत नाही. शहरी पर्यावरणाशी संलग्न बाबींची हाताळणी करणारी आरोग्य, वन, पर्यावरण यांसारखी मंत्रालये कार्यरत असली तरी, शहरी पर्यावरणाचे संगोपन व त्याच्याशी संलग्न बाबींचे सुसूत्रीकरण हा या मंत्रालयांच्या कार्यभाराचा झोत नसतो आणि नाही. केवळ एवढेच नाही तर, ही मंत्रालये आपापल्या परीने कामे करत राहतात. त्यांच्यात परस्परसंवादाचा व समन्वयाचाही अभावच प्रत्यक्ष व्यवहारात अनुभवास येतो. शहरांच्या पातळीवर

सगळे कामकाज चालते ते विभागश:. शहरी पर्यावरण संगोपनाशी थेट संलग्न असलेले पाणीपुरवठा, मलनि:स्सारण, आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन, शहरांतर्गत सार्वजनिक वाहतूक, वाहतूक नियोजन, शहर नियोजन अशांसारखे विभागही स्वायत्तरीत्याचे त्यांची कामे हाकताना दिसतात.

शहरी पर्यावरणाशी निगडित ज्या समस्या आता वेगाने पुढे येत आहेत त्यांचे स्वरूप व गांभीर्य तितक्याच संवेदनशीलतेने जोखून त्यांना नेमका प्रतिसाद देण्याची प्रगल्भता व तांत्रिक क्षमता शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारव्यवस्थेत नसणे, हा सत्तेच्या या तिसऱ्या स्तराच्या कार्यव्यवस्थेतील सर्वाधिक कच्चा दुवा ठरतो. शहरी पर्यावरणसंलग्न समस्यांच्या यथायोग्य आकलनासाठी आणि त्यांच्या सोडवणुकीसाठी गरजेची असलेली क्षमताच मुळात स्थानिक स्वराज्य संस्थांपाशी नसल्याने सगळ्याच समस्यांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आणि म्हणूनच आणखी जटिल बनते. वातावरणीय बदलांपायी निर्माण होत असणाऱ्या आव्हानांचे रंगरूप बारकाईने जाणून घेण्याबाबतची घाऊक अनास्था ही या सगळ्यांतील पायाभूत अडचण आहे. अशा बहुपदरी आव्हानांचे आकलन सर्वंकषपणे करून घेण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित विभागांमध्ये ज्या सुसंवादाची व सुसूत्रीकरणाची अतिशय गरज असते तिचाही सार्वत्रिक अभावच प्रत्यक्ष कार्यपद्धतीमध्ये आढळून येतो.

शहरी पर्यावरणासंदर्भात उद्‌भवत असणाऱ्या समस्यांचा सामना आणि निपटारा करण्यासाठी निकडीच्या असणाऱ्या निधीची पुरेशी उपलब्धता नसणे, हा, या संदर्भातील वित्तीय अंगाचा मुख्य गाभा होय. सत्तेच्या उतरंडीमध्ये सर्वांत तळाला असणाऱ्या ग्रामीण तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे जबाबदाऱ्या आणि निधी या दोहोंचे वर्गीकरण घडून येणे ७३व्या व ७४व्या घटनादुरुस्तीद्वारे अपेक्षित होते व आवश्यकही. प्रत्यक्षातील चित्र मात्र वेगळेच आहे. शहरी स्थानिक स्वराज्य संस्था निधीच्या पुरवठ्यासाठी सत्तेच्या उतरंडीमध्ये वरच्या स्तरांवर असणाऱ्या संस्थात्मक रचनेवरच बहुश: अवलंबून आहेत. आर्थिक बाबींसंदर्भातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची अशी परवशता ही सगळ्यांच अडचणींचे मूळ शाबीत होते. ही समस्या दुहेरी स्वरूपाची आहे. मुळात, शहरी स्थानिक स्वराज्य संस्था वित्तीय बाबतींत परावलंबी आहेत, ही झाली प्राथमिक अडचण. आणि, शहरी पातळीवर निर्माण होणाऱ्या पर्यावरणसंलग्न समस्यांचे निराकरण घडवून आणण्यासाठी केंद्र सरकार आणि/अथवा राज्य सरकारे यांच्यापाशीही विशेष निधीपुरवठ्याची तरतूद नाही, ही झाली दुसरी अडचण. आपल्या गरजा भागविण्यासाठी वाढीव निधी निर्माण करण्याच्या

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षमतादेखील अतिशय मर्यादित अशाच आहेत.

शहरी पर्यावरणीय समस्यांचे मूळ शहरांपेक्षा व्यापक स्तरावर घडून येत असलेल्या घडामोडींशी निगडित असल्याने त्यांचा मुकाबला स्थानीय पातळीवर केला जाणे शक्य नाही, अशा प्रकारची मानसिकता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित घटकांमध्ये प्रकर्षाने नांदताना दिसते. या आधी विवेचन केलेल्या तीनही अडथळ्यांपायी, शहरी पर्यावरणीय आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करण्यासाठी आवश्यक ती तंत्रशास्त्रे विकसित करण्याकडेही आजवर दुर्लक्ष होत आलेले आहे. स्थानीय पर्यावरणाच्या हेळसांडीपायी निर्माण होणारी आव्हाने हाताळू शकतील अशा प्रकारची तंत्रशास्त्रे स्थानीय पातळीवर विकसित करण्यासाठी पुरेसा निधी शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांपाशी नसतो व नाही, ही झाली पहिली अडचण. तर, शहरी पर्यावरणीय समस्यांचे रंगरूप, बरेचदा आणि स्वाभाविकत:, निखळ स्थानीय स्वरूपाचे असल्याने अन्य कोणी दुसऱ्या एखाद्या शहरी पर्यावरणीय समस्येच्या सोडवणुकीसाठी तयार केलेली उपाययोजना ‘सब घोडे बारा टक्के’ या न्यायाने सार्वत्रिकरीत्या उपयुक्तही ठरत नाही अन् राबविताही येत नाही.

भारतासारख्या, अतिशय वेगाने नागरीकरण घडून येत असलेल्या आणि नागरीकरणाच्या विकासात व विस्तारात सघन असमानता असणाऱ्या देशात शहरी पर्यावरणाचे ढासळणारे संतुलन ही बाब आवश्यक तेवढ्या प्राधान्याने शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्रमपत्रिकेवर आजही येताना दिसत नाही. त्याला कारणेही तितकीच सबळ व व्यावहारिक आहेत. शहरी विकासाचे व्यवस्थापन, शहरांचा विकास आणि शहरांचे नियोजन याच्याशी संलग्न ज्या अन्य निकडीच्या बाबी आहेत त्यांच्यावरच शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराच मुख्य झोत एकवटलेला राहतो, ही अतिशय अवघड समस्या इथे शाबीत होते. त्यांमुळे, शहरवासियांच्या राहणीमानावर थेट परिणाम घडवून आणणाऱ्या अन्य बाबींची पूर्तता केल्यानंतर शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उरलेल्या क्षमता आणि उरलेला निधी शहरी पर्यावरणाकडे वळवला जातो, हे कटू वास्तव नाकारता येत नाही. परिणामी, ‘शहरी पर्यावरण’ हा विषय प्राधान्यक्रमाच्या उतरंडीमध्ये खाली कोठे तरी घरंगळून जातो!

# आर्थिक

## वाढता वाढता वाढती कर्जांचे डोंगर...

'अंथरूण पाहून पाय पसरावेत', ही म्हण आताशा कोणी उच्चारतदेखील नाही. आर्थिक पुनर्रचनेचे पर्व जागतिक अर्थव्यवस्थेत १९८०च्या दशकापासून अवतरल्यानंतर ज्या पिढ्या जन्माला आल्या त्यांना हा वाक्प्रचार ठाऊक नसावा, हे त्यांमुळे समजण्यासारखे आहे. अति खर्चाळूपणा जसा अयोग्य तसाच अतिरेकी कंजुषपणादेखील त्याज्यच. आपल्या जगण्यात या दोन्हीचे संतुलन आवश्यक असते आणि इष्टही. हे सूत्र केवळ व्यक्तिगत जीवनातच नव्हे तर, व्यापक स्तरावरही जपावे लागते. या मार्गदर्शक तत्त्वाचा दक्षपणे अवलंब केला न गेल्याने जगभरात सर्वत्रच आज कर्जांचे डोंगर वाढत असल्याचे वास्तव नजरेच्या पुढ्यात उभरते आहे. 'ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को-ऑपरेशन अ‍ॅन्ड डेव्हलपमेन्ट' (ओइसीडी) या संघटनेच्या सदस्य देशांच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या एका अहवालाचे अंतरंग या संदर्भात डोळ्यांत अंजन घालणारे आहे. देशोदेशींची सरकारे (शासनसंस्था) आणि देशादेशांत कार्यरत असणाऱ्या खासगी कॉर्पोरेट कंपन्या यांच्या माथ्यावरील कर्जांचा भार वाढत चालला असल्याचे चिंतनीय (आणि, तितकेच चिंताजनक) चित्र हा अहवाल चितारतो. भांडवल बाजारात कर्जरोखे विक्रीस काढून पैसा उभा करण्याचा परिपाठ देशोदेशींची सरकारे आणि कॉर्पोरेट कंपन्या गेले किमान दीड दशक सतत अवलंबत आलेल्या आहेत. अमेरिकी 'सब्प्राइम' कर्जांचा फुगा २००८ साली फुटल्यानंतर वैश्विक अर्थव्यवस्थेत संचारलेली मंदी आणि त्या नंतर अवघ्या एका तपानंतरच, म्हणजे, २०२० साली अवतरलेला 'कोविड-१९'चा हैदोस या दोहोंच्या दणक्यांतून वाचण्यासाठी कर्जरोखे विक्रीस काढून पैसा गोळा करण्याचा पर्याय शासनसंस्थांप्रमाणेच खासगी कॉर्पोरेट विश्वानेदेखील मनोभावे अवलंबला. परंतु, ते अस्त्र आता भस्मासुरासारखे जगाच्याच माथ्यावर हात ठेवण्यासाठी सरसावते आहे, अशी भीती हा अहवाल व्यक्त करतो.

शासनसंस्था असो, कॉर्पोरेट बलदंड असो अथवा सामान्य माणूस असो, कर्ज किती, कसे व कोणाकडून काढले यांपेक्षाही, कर्जाऊ घेतलेल्या निधीचा वापर कशासाठी केला गेला हे अधिक महत्त्वाचे ठरते. जगभरात सर्वत्रच उभे ठाकलेले कर्जांचे डोंगर अनाठायी आणि बेलगाम वित्तीय बेशिस्तीपायी उभे ठाकलेले आहेत, असे कोणीच म्हणणार नाही. 'सब्प्राइम' कर्जांचा फुगा आणि 'कोरोना' या दोहोंपायी वैश्विक अर्थव्यवस्थेला वेटाळून गिळंकृत करू पाहणाऱ्या मंदीचे मळभ विरळ बनवण्यासाठी अर्थव्यवस्थांना खर्चाचा टेकू पुरविणे त्या सगळ्या काळात अनिवार्यच बनलेले होते. अर्थकारण ठप्प होऊन पडलेले असल्याने करसंकलनाद्वारे शासनसंस्थेकडे रोकड जमा होण्याची शक्यता निकालात निघालेली होती. त्यांमुळे, कर्जरोखे विकून पैसा उभा करण्याखेरीज शासनसंस्थांना अन्य मार्गच नव्हता. अन्यथा, घरंगळीला लागलेल्या अर्थव्यवस्था अधिक सघन मंदीच्या गर्तेत लोटल्या गेल्या असत्या. दुसरीकडे, 'सब्प्राइम' कर्जांच्या हबक्याने मेटाकुटीस आलेल्या बँकिंग क्षेत्राने कर्जवाटपासंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे आणि नियम-कानून कमालीचे काटेकोर बनविल्याने खासगी कॉर्पोरेट विश्वाला बँकांकडून कर्जे घेण्यापेक्षा भांडवल बाजारात आपले कर्जरोखे विकून गुंतवणूकयोग्य भांडवलाची उभारणी करणे, अधिक सोयीचे वाटत राहिले. या दोहोंपायी आज निर्माण होऊ घातलेले आव्हान अधिकच कसोटी बघणारे आहे. पूर्वी उभारलेल्या कर्जांची परतफेड कशी करावयाची, एवढ्यापुरताच आजच्या प्रश्नाचा परीघ मर्यादित राहिलेला नाही.

इथून पुढच्या काळात उग्र होऊ घातलेल्या आव्हानांचे रूप-स्वरूप पाहता त्यांच्या निराकरणार्थ जी भलीथोरली गुंतवणूक निकडीची ठरणार आहे, तिच्यासाठी भांडवल उभारणीचे कोणते मार्ग चाचपायचे हा आजचा खरा सवाल आहे. म्हणजेच, हे कोडे दुहेरी आहे. जुन्या कर्जांचा भार हलका करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत असतानाच, उद्याच्या समस्यांना तोंड देण्याच्या दृष्टीने जी भांडवली गुंतवणूक करावी लागेल तिचीही जुळवाजुळव करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. अलीकडील काळात जवळपास सगळ्यांच देशांनी अतिशय सैल आणि उदार अशा पैसा धोरणाचा अवलंब केल्यामुळे व्याजांची सरासरी दर पातळी नरम राहिलेली आहे. परंतु, म्हणून पूर्वी उभारलेल्या कर्जांवरील व्याजाचा भरणा करावयाच्या रकमेचा भार हलका होत नाही. पूर्वीची कर्जे आणि त्यांच्यावर देणे असलेले व्याज भरणे क्रमप्राप्तच आहे. परंतु, उद्या, समजा, जुनी कर्जे परत करण्यासाठी नव्याने कर्जे घेणे भाग पडले तर त्या कर्जांवरील व्याज दर हा आजच्या तुलनेत चढा राहण्याचीच शक्यता अधिक.

त्याचे कारण सोपे आहे. उदार अशा पैसा धोरणापायी महागाईला चालना मिळण्यास येत्या काळात वेळ लागणार नाही. दुसरीकडे, जगात वेगवेगळ्या भागांत निरनिराळ्या कारणांपायी नांदत असलेली युध्यमान परिस्थिती, आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या प्रांतात सुरू असलेले शुल्कवाढीचे वाद यांपायी वैश्विक स्तरावरील पुरवठासाखळ्या बाधित बनत आहेत. त्याचा फटका व्यापाराला बसून वस्तू आणि सेवांच्या दरवाढीचे सत्र सुरू होण्याची शक्यता मोठी आहे. या सगळ्यांतून उद्‌भवणाऱ्या महागाईला लगाम घालण्यासाठी कठोर पैसा धोरण अवलंबणे अनिवार्य ठरले की व्याज दर आपोआपच वाढतील आणि कर्जे महाग बनतील.

'ओइसीडी'ने तयार केलेल्या अहवालामध्ये याच समस्येचा उच्चार केलेला आहे. कर्जे उभारणे हे शासनसंस्था अगर/आणि खासगी कॉर्पोरेट विश्व या दोघांनाही नवीन नाही. आता झाले आहे ते इतकेच की, 'कोविड-१९'च्या फेरा येण्यापूर्वी ज्या गतीने व ज्या मात्रेने कर्जउभारणी केली जात होती त्याच्यापेक्षा किती तरी अधिक मात्रेने 'कोविड-१९'पश्चात कर्जे घेतली जात आहेत. जगभरातील भांडवली बाजारांत कर्जरोखे विकून शासनसंस्था आणि कॉर्पोरेट कंपन्यांनी गेल्या वर्षी, म्हणजे, २०२४ साली २५ लाख कोटी अमेरिकी डॉलर्स इतक्या अवाढव्य रकमेची कर्जे उभारली. कर्जरोख्यांच्या माध्यमातून शासनसंस्था आणि कॉर्पोरेट कंपन्यांनी २००७ साली जितकी रक्कम उभारली होती त्याच्या तिप्पट रक्कम एकट्या २०२४ या वर्षांत कर्जाऊ घेतली गेली. शासनसंस्था आणि खासगी उद्योगांचे विश्व यांनी कर्जरोखे विक्रीस काढून उभारलेल्या कर्जांची रक्कम २०२४ साली १०० लाख कोटी अमेरिकी डॉलर्सचा पल्ला पार करून गेली. 'ओइसीडी' देशसमूहात अंतर्भूत असणाऱ्या देशांच्या एकत्रित कर्जांचे त्यांच्या एकत्रित ठोकळ उत्पादनाशी २०२३ साली असलेले ८२ टक्के इतके सरासरी गुणोत्तर, त्या नंतरच्या एकाच वर्षात, म्हणजे, २०२४ साली दोन पर्सेन्टेज् पॉइंट्स्‌नी वाढून ८४ टक्क्यांवर पोहोचले. चालू वित्तीय वर्षात हेच गुणोत्तर ८५ टक्क्यांना टेकेल असा अंदाज वर्तवला जातो आहे. २००७ सालाच्या तुलनेत हे प्रमाण २०२५ साली दुप्पट भरते. तर, २०१९ सालाच्या तुलनेत, म्हणजेच, 'कोविड'पूर्व काळाच्या तुलनेत हे प्रमाण १० पर्सेन्टेज् पॉइंट्स्‌नी वाढलेले दिसेल.

अहवालाच्या दाखल्यानुसार, शासनसंस्था आणि कॉर्पोरेट कंपन्या 'कोविड-१९'पूर्वी, म्हणजे २०१५ ते २०१९ या कालावधीदरम्यान जेवढी कर्जउभारणी दरवर्षी सरासरीने करत असत त्याच्यापेक्षा तब्बल १० लाख कोटी अमेरिकी डॉलर्स

एवढ्या अवाढव्य रकमेची वाढीव कर्जे ‘कोविड’नंतर दरवर्षी भांडवल बाजारातून उचलत आहेत! दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर, ‘कोविड’नंतरच्या काळात दरवर्षी उभारल्या जाणाऱ्या या अतिरिक्त कर्जांची रक्कम जर्मनी आणि जपान या दोन देशांच्या ठोकळ देशी उत्पादनाच्या बेरजेपेक्षाही अधिक भरते. कर्जांच्या मागणीमध्ये घडून आलेल्या या वाढीपायी व्याजांची सरासरी दर पातळी उंचावली जावी, यात अस्वाभाविक काहीच नाही. असे झाले की, पूर्वी घेतलेल्या कर्जांची परतफेड करण्यासाठी नव्याने उभारलेल्या कर्जांवरील व्याजाचा भरणा करण्याची रक्कमही फुगावी, हे ओघानेच येते. दीर्घ मुदतीच्या कर्जांवर आकारल्या जाणाऱ्या सरासरी व्याजदरांनीदेखील, या सगळ्याचा परिणाम म्हणून की काय, गेल्या २० वर्षांतील सर्वाधिक पातळी २०२४ साली गाठली.

या वास्तवाचे दूरगामी परिणाम अधिक गंभीर दिसतात. ‘सबप्राइम’ कर्जांची समस्या आणि ‘कोविड’ या दोहोंमुळे निर्माण झालेल्या आर्थिक मंदीवर मात करण्यासाठी शासनसंस्थांनी खर्चाकडे ओणवा केलेला हात अर्थव्यवस्थांना तात्कालिक टेकू पुरवण्यापायीच व्यस्त होऊन गेला. अर्थव्यवस्थांचे दूरगामी सक्षमीकरण साध्य करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुंतवणुकीला, त्यांमुळे, बगल द्यावी लागली अथवा अशी गुंतवणूक लांबणीवर टाकणे भाग पडले. आता, अर्थव्यवस्थांमधील उत्पादक क्षमतांचे दीर्घकालीन सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी जी भांडवली गुंतवणूक येत्या काळात गरजेची ठरणार आहे, तिची बेगमी करण्याचे आव्हान आता सगळ्यांत अवघड आहे. त्यासाठी आवश्यक असणारा निधी शासनसंस्था आणि कॉर्पोरेट कंपन्यांना चढ्या व्याजदराने कर्जे घेऊनच उभारावा लागेल.

अर्थव्यवस्थांच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक असणारी गुंतवणूक करण्यासाठी कर्जरोखे विकून ती नवीन कर्जउभारणी ज्या आर्थिक पर्यावरणात होत राहील ते पर्यावरणदेखील सुरळीत व तंदुरुस्त नसण्याचीच शक्यता अधिक. चालू शतकातील पहिल्या दोन दशकांत वैश्विक अर्थकारणाला जे दोन मोठे फटके बसले त्यांचे व्रण सगळ्यांच अर्थव्यवस्था आजही कमी-अधिक प्रमाणात अंगावर वागवत आहेत. आर्थिक वाढविकासाचा सरासरी वार्षिक वेग त्या मानाने अशक्तच आहे. भू-राजकीय समस्या अधिक गुंतागुंतीच्या बनत चाललेल्या आहेत. सशस्त्र संघर्षांमुळे एकंदरीनेच अशांतता आणि अनिश्चितता अधिकच वाढलेली आहे. आर्थिक विकासाचा प्राधान्यक्रम अधिकच टोकदार बनतो आहे. कोणत्या बाबींना किती महत्त्व व प्राधान्य द्यायचे या संदर्भातील निर्णय घेणे शासनसंस्थांना अधिकाधिक अवघड

बनत चाललेले आहे. अशा परिस्थितीत, दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी चढ्या व्याजदराने उभारलेली कर्जे पुढे फेडणे अधिकच जोखमीचे बनेल.

आंतरराष्ट्रीय व्यापारासंदर्भातील मानसिकता आणि माहौल आता अचानक बदललेला आहे. आपापल्या अर्थव्यवस्थांची स्पर्धात्मकता टिकवून धरण्यासाठी प्रत्येकच देशाला पायाभूत सेवासुविधांमध्ये भरभक्कम गुंतवणूक करणे इथुन पुढे सतत भाग पडणार आहे. दुसरीकडे, पर्यावरणीय बदलांपायी उभ्या ठाकणाऱ्या संभाव्य समस्यांचा सामना करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांखातर मोठ्या निधींची तरतूद अत्यावश्यक बनते आहे. तिसरीकडे, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या उपयोजनापायी जी नवीन यंत्रतंत्रात्मक व्यवस्था आकार घेऊ पाहते आहे तिच्याशी निगडीत गुंतवणूक हाती घेण्याचे आव्हान सगळ्यांच देशांच्या पुढ्यात आहेच. सगळीकडेच सशस्त्र संघर्षाचे वातावरण पसरत असल्याने आपापली संरक्षणसिद्धता सज्ज राखण्यासाठी सैन्यदलांच्या आधुनिकीकरणासाठी पुरेसा निधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्याखेरीज आज कोणालाच पर्याय नाही. म्हणजेच, मोठ्या गुंतवणुकीच्या गरजा पुढ्यात उभ्या ठाकत असल्यामुळे, भांडवल बाजारात कर्जरोख्यांच्या विक्रीद्वारे कर्जाऊ निधी उभारण्याचा पर्याय सगळ्यांच देशांना येत्या काळात कुशलतेने हाताळावा लागणार आहे.

परंतु हे पुरेसे ठरणार नाही, असे हा अहवाल बजावतो. उभारलेल्या कर्जांची परतफेड आणि देय व्याजाचा नियमित भरणा यांचे तंत्र सांभाळायचे तर संबंधित देशांना वित्तीय शिस्तीचा अवलंब कठोरपणे करणे भाग ठरेल. कररूपाने पुरेसा निधी शासनसंस्थेच्या तिजोरीमध्ये संकलित व्हावा यासाठी संरचनात्मक बदलांना चालना देऊन अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा वार्षिक सरासरी वेग चांगल्यापैकी दमदार राखावा लागेल. महसुलाची बेगमी करत असतानाच, दुसरीकडे, शासनसंस्थेच्या तिजोरीमधून खर्च होणाऱ्या प्रत्येक रुपयाची उत्पादकतादेखील अव्वल राहील, याकडे सरकारांना डोळ्यांत तेल घालून लक्ष पुरवावे लागेल, असे या अहवालाचे प्रतिपादन आहे. जो न्याय शासनसंस्थेला तोच न्याय खासगी कॉर्पोरेट क्षेत्राला लागू होतो. कर्जरोखे विक्रीस काढून उभारलेल्या कर्जांचा विनियोग उद्योगाची उत्पादकता सरस बनवण्याकडेच कसा केला जाईल, यांवर कॉर्पोरेट कंपन्यांना काटेकोर निगराणी ठेवावीच लागेल. परंतु त्यासाठी खासगी क्षेत्राला त्या दिशेने प्रवृत्त करण्यासाठी आवश्यक व उचित अशा सवलतींची योजना शासनसंस्थेनेही करणे गरजेचे आहे.

विकसनशील देशांनी, आणि खासकरून ज्या विकसनशील देशांमधील भांडवली बाजारपेठा चांगल्यापैकी लांबरूंद व सखोल आहेत अशा देशांनी, शक्यतो देशी

भांडवल बाजारातूनच कर्जरोख्यांद्वारे निधी उभारणी करावी, असा या अहवालाचा सांगावा आहे. कारण, देशी भांडवल बाजारांतून देशी चलनातील कर्जउभारणी करणे दीर्घकालात तुलनेने अधिक सुरक्षित ठरत असल्याचे दाखले अलीकडील काळात सर्वत्र मिळत आहेत. जागतिक भांडवल बाजारातून अमेरिकी डॉलरमधील कर्जे उभारण्याने जोखमीत अधिकच भर पडते. एक तर, अमेरिकी बाजारपेठेत व्याजांची दरपातळी ज्या प्रमाणे बदलते त्याचे प्रतिबिंब जगभरातील व्याजदरांच्या संरचनेत उमटते. दुसरे म्हणजे, जागतिक स्तरावरील अस्थिरतेचा परिणाम, विदेशी चलनाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अमेरिकी डॉलरच्या विविध देशांच्या चलनाबरोबरील विनिमय दरावर घडून येत राहतो. यांपायी, परकीय चलनाच्या रूपातील कर्जांशी निगडित दोलायमानतेमध्ये वाढ घडत राहते. त्याचे पडसाद परकीय चलनाच्या रूपातील कर्जांची परतफेड व व्याजाचा भरणा या दोहोंमध्ये उमटत राहतात. त्यांमुळे, ज्या देशांच्या स्वत:च्या अंतर्गत भांडवल बाजारपेठा सुदृढ आहेत त्यांनी शक्यतो देशी भांडवल बाजारातच कर्जरोखे विकून गुंतवणुकीसाठी निधी उभारावा असा या अहवालाचा सल्ला आहे. त्या दृष्टीने देशी भांडवल बाजाराच्या विकासाकडे विकसनशील देशांनी व उभरत्या अर्थव्यवस्थांनी येत्या काळात अधिक लक्ष पुरवावे, असा या अहवालातील चर्चामंथनाचा एकंदरीने सूर दिसतो.

पैसा उभा करण्याची शासनसंस्थेची क्षमता एखादी व्यक्ती अथवा/आणि कॉर्पोरेट उद्योग यांच्यापेक्षा किती तरी जास्त असते, हे मान्य केले तरी, ‘अंथरूण पाहून पाय पसरावे’ या वित्तीय सुज्ञतेला सरसहा फाटा देता येत नाही, हे वास्तव या सगळ्या उहापोहातून उभरते हे निर्विवाद. भांडवल बाजारातून कर्जरोख्यांच्या विक्रीद्वारे निधी उभारणी करायची असेल तर सगळ्यांच संबंधितांना त्यांचे पतमापन (क्रेडिट रेटिंग) अव्वल ठेवण्याखेरीज गत्यंतर नाही. त्यासाठी वाटेल ते झाले तरी, कठोर वित्तीय शिस्तीची कास सोडता येणार नाही. उदार अशा पैसा धोरणाचा माहौल सर्वत्र नांदत असताना सुलभ व्याजदराने उभारलेल्या कर्जांचा भार आजमितीस तितकासा जाचक भासत नसला तरी, येत्या काळातील संभाव्य चित्र ध्यानात ठेवूनच कर्जरोख्यांच्या विक्रीद्वारे गुंतवणुकीसाठी निधी उभारण्याची दक्षता शासनसंस्था आणि कॉर्पोरेट विश्वाला सतत बाळगावी लागेल, हाच या साऱ्या मंथनाचा इत्यर्थ!

# भूस्तर विज्ञान

दुर्मीळ खनिज घटकांच्या विश्वात...

## ‘दुर्मीळ’चा नेमका अर्थ काय?

दुर्मीळ खनिज घटकांची पुरवठासाखळी आपल्या मुठीत पकडबंद करून चीन, एका परीने, सगळ्या जगालाच वेठीला धरू पाहतो आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनविरुद्ध छेडलेल्या व्यापारयुद्धातील हा एक अतिशय नाजूक आणि तितकाच संवेदनशील व्यूह. अशा प्रकारे जगाची नाकेबंदी करणे काही थोडा काळ चीनला शक्य आहे; परंतु, मुळात निर्यातप्रधान आर्थिक विकासाचे धोरण पहिल्यापासून राबविणाऱ्या आणि नानाविध अंतर्गत समस्यांशी दोन हात करणाऱ्या आजच्या चीनला ‘साधन राष्ट्रवादा’चा (रिसोर्स नॅशनॅलिझम) हा बाणा प्रदीर्घ काळ धारण करणे आत्मघातकीपणाचे शाबीत होईल, अशी एक भूमिका या संदर्भात अभ्यासकांकडून मांडली जाते. मुळात, दुर्मीळ खनिजांचे उत्पादन व पुरवठा यांच्या प्रांतात, एके काळी, वरचष्मा गाजविणाऱ्या अमेरिकेची या आघाडीवरून पीछेहाट का झाली आणि तशी पीछेहाट होण्यात या खनिज घटकांना जोडल्या जाणाऱ्या ‘दुर्मीळ’ या विशेषणाचा नेमका काय हात आहे, हे जाणून घेणे रोचक ठरते.

दुर्मीळ खनिज घटकांच्या (Rare Earth Elements - REE) या शब्दयोजनेतील ‘दुर्मीळ’ हा शब्द इथे दिशाभूल करणारा ठरतो. ‘सहजासहजी न सापडणारा’, ‘सहज न मिळणारा’, ‘दुर्लभ’ हे ‘दुर्मीळ’ या शब्दाचे शब्दकोशातील अर्थ. परंतु, दुर्मीळ खनिज घटकांच्या संदर्भात ‘दुर्मीळ’ या शब्दाला असलेल्या या पारंपरिक अर्थच्छटा गैरलागू ठरतात. दुर्मीळ खनिज घटकांच्या गटातील बहुतेक सगळी खनिजद्रव्ये पृथ्वीच्या पृष्ठभागीय स्तरामध्ये मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत आणि होतातही. परंतु, ही खनिज द्रव्ये माती अगर खडकांमधून वेगळी काढण्यासाठी करावी लागणारी प्रक्रिया मोठी गुंतागुंतीची आणि किचकट असते. केवळ इतकेच नाही तर, ही खनिज द्रव्ये मातीमधून अलग करण्यासाठी ज्या रासायनिक प्रक्रिया घडवाव्या लागतात त्यांचे गंभीर असे पर्यावरणीय दुष्परिणामही संभवतात आणि घडतातही.

या अर्थाने ही खनिजे सहजासहजी मिळणाऱ्यांतील नव्हेत. म्हणजे, त्यांची उपलब्धता मुबलक आहे परंतु प्रक्रियेअंती ती निसर्गातून अलग करून हस्तगत करण्याची सगळी कार्यपद्धती सहजसुलभ नसल्यामुळे फारसे कोणी त्या प्रांतात पाय घालत नाहीत. दुर्मीळ खनिज घटकांचे शोधन, उत्खनन, विलगीकरण आणि प्रक्रियेअंती उत्पादन ही बरीच लंबीचवडी साखळी असल्यामुळे त्यांची निर्मिती आर्थिकदृष्ट्यादेखील तितकीशी आकर्षक नसल्यामुळे त्यांत गुंतवणूक करण्यात उद्योगजगतातील हिकमतींना फार मर्यादित स्वारस्य राहते. त्यांमुळे, या उत्पादन क्षेत्रात एके काळी अमेरिका आणि आजमितीस चीन असे मोजकेच उत्पादक सक्रिय असल्यामुळे त्यांचा घाऊक पुरवठा सरसहा, सरधोपट केला जात नाही, या अर्थाने हे खनिज घटक 'दुर्मीळ' ठरतात अथवा गणले जातात.

अगदी शोधाच्या बिंदूपासूनच दुर्मीळ खनिज घटकांची अंगभूत अशी रासायनिक मूल्ये, वैशिष्ट्ये, गुणधर्म आणि त्यांच्यात सामावलेल्या क्षमता यांच्याबद्दल अपरंपार कुतूहल नांदत आलेले आहे. स्वीडनच्या सेनादलामध्ये लेफ्टनंट या हुद्यावर सेवा बजावणाऱ्या Carl Axel Arrhenius या स्वीडिश सेनाधिकाऱ्याने १७८७ साली या दुर्मीळ खनिज घटकांचा शोध पहिल्यांदा लावला. या खनिज घटकांमध्ये मुख्यत: दोन प्रकार दिसतात. यांतील काही 'जड' अथवा 'वजनदार' या गटात मोडतात तर काही 'हलकी' अथवा 'सौम्य' या वर्गात समाविष्ट होतात. आजवरचा अनुभव असा आहे की, 'जड' अथवा 'वजनदार' या गटात समाविष्ट असणाऱ्या दुर्मीळ खनिज घटकांच्या तुलनेत 'हलक्या' अथवा 'सौम्य' गटातील खनिज घटक अधिक मात्रेने उपलब्ध होतात. Lanthanum, Cerium, Praseodymium, Neodymium, Samarium ही खनिजे हलकी अथवा सौम्य या गटात मोडतात. तर, Erbium, Europium, Terbium, Gadolinium ही जड अथवा वजनदार दुर्मीळ खनिज घटकांच्या गटातील काही नावे. उच्च तंत्रशास्त्रीय उत्पादनप्रक्रियांमध्ये जड दुर्मीळ खनिज घटकांचा वापर तुलनेने अधिकतर केला जातो. हलक्या अगर सौम्य या गटात समाविष्ट होणाऱ्या दुर्मीळ खनिज घटकांच्या तुलनेत जड खनिज घटक त्या मानाने कमी मात्रेने उपलब्ध होतात.

या दोन्ही गटांतील खनिज घटक पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या कठीण थरात सर्वत्र मुबलक प्रमाणात आढळून येतात. फक्त गंमत अशी की त्यांचे साठे एकत्रित अथवा केंद्रीभूत स्वरूपात एकगठ्ठा गवसत नाहीत. तर, पृथ्वीतील अनेकानेक खनिजांमध्ये ती लहान लहान मात्रेने केंद्रीभूत होऊन पुंजक्यांच्या (concentrates) स्वरूपात

पडून असतात. पृथ्वीच्या कवच्याचा जो कठीण स्तर असतो त्यातील महाकाय खडकांमध्ये यांचे लहान लहान पुंजके विखरून पडलेले असतात अन्य अनेक खनिजांमध्ये मिसळून. वजनाच्या दृष्टीने पहायला गेले तर दर दशलक्ष भागांत दहा किंवा काही शेकड्यांच्या घरात इतक्या अल्प प्रमाणातच हे पुंजके अन्य खनिजांमध्ये मिसळून विखुरलेले असतात. दुर्मीळ खनिज घटकांचे शोधन, उत्खनन करून त्यांच्यावर प्रक्रिया करणे ही सगळीच साखळी आर्थिकदृष्ट्या किफायतशीर शाबीत न होण्याचे मुख्य कारण काही असेल तर ते हेच.

पृथ्वीच्या कवचाच्या कठीण स्तरांतील अनेकानेक खनिजांमध्ये दुर्मीळ खनिज घटकांचा आढळ होतो हे खरे असले तरी, Bastnaesite आणि Monazite या दोन खनिजांत दुर्मीळ खनिज घटक तुलनेने मुबलक प्रमाणात आढळून येतात. या दोहोंतील Bastnaesite मध्ये 'जड' अथवा 'वजनदार' या उपगटातील दुर्मीळ खनिज घटकही सापडत असले तरी यात मुख्यत: सापडतात ते हलक्या अथवा सौम्य या उपगटातील दुर्मीळ खनिज घटक. तर, Monazite या खनिजात जड तसेच सौम्य अशा दोन्ही उपगटांतील दुर्मीळ खनिज घटक आढळून येतात. आजचे चित्र असे आहे की, Bastnaesite या खनिजाचे साठे घाऊक प्रमाणावर सापडणारे जगाच्या पाठीवरील दोन देश म्हणजे अमेरिका आणि चीन. टक्केवारीच्या परिभाषेत बोलायचे झाले तर, संपूर्ण जगात Bastnaesiteचे जेवढे साठे आहेत त्यांतील सर्वाधिक अंश याच दोन देशांमधील भूगर्भात एकवटलेला आहे. त्या मानाने Monaziteचे साठे मिळणाऱ्या देशांची संख्या तशी चांगली मोठी दिसते. ऑस्ट्रेलिया, ब्राझील, चीन, भारत, मलेशिया, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, थायलंड आणि अमेरिका हे देश Monaziteच्या साठ्यांच्याबाबतीत सुदैवी ठरतात.

दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनक्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, एक वेळ, खाणींमधून सोने काढणे सोपे म्हणावे लागेल इतके दुर्मीळ खनिज घटकांचे उत्खनन, विलगीकरण आणि शुद्धीकरण कटकटीचे शाबीत होते. ही वस्तुस्थिती अनेकदा अनेकांच्या ध्यानात येत नाही. अगदी सोप्या भाषेत बोलायचे तर, सोन्याचे कण अथवा अंश सामावलेले दगड-माती सोडियम सायनाइडमध्ये मिसळले की सोन्याचा अंश आपसूकच वेगळा होऊन हाताला लागतो. मातीपासून सोने अलगद अलग होते. परंतु, दुर्मीळ खनिज घटकांचे मात्र तसे अजिबात नाही. Bastnaesiteमधून दुर्मीळ खनिज घटक विलग करण्याची कृती किती किचकट आहे याचे उदाहरण, केवळ वानगीदाखल, या संदर्भात पुरेसे बोलके ठरावे. अनेक रासायनिक क्रिया-प्रक्रियांचा अंतर्भाव

असणारी आणि एकातून एक निघणाऱ्या अनेक पायऱ्यांमधून पुढे सरकणारी ही प्रक्रिया चांगल्यापैकी दमछाक करणारी अशीच आहे. त्यांमुळेच ती सज्जड महागडीदेखील शाबीत होते.

मातीमध्ये, पृथ्वीच्या पृष्ठभागावरील कठीण स्तरांतील कातळांत अशोधित अथवा अशुद्ध स्वरूपातील Bastnaesite सापडते. उत्खनन करून ते काढणे ही झाली या प्रक्रियेतील अगदी पहिली पायरी. Bastnaesite सामावलेल्या दगड–मातीमध्ये अशुद्ध स्वरूपातील अन्य क्षुद्र खनिजेही लहान–मोठ्या प्रमाणात मिसळलेली असतात. खनिजांच्या अशा त्या संमिश्र खजिन्यातून प्रथम Bastnaesite अलग करणे गरजेचे असते. त्यासाठी खणून काढलेले मोठाले खनिजयुक्त दगड दळून त्यांचे वाळूसारख्या लहान लहान कणांमध्ये रूपांतर घडवून आणले जाते. त्यानंतर ती वाळू मळणयंत्रात घालून तिचे अगदी बारीक भुकटी अथवा लगद्यात रूपांतर केले जाते. त्यांमुळे, त्या दगडांत अगर मातींत असलेली वेगवेगळी खनिजे एकमेकांपासून सुटून अलग बनतात. आता, अनंत प्रकारची खनिजे अलग झालेल्या त्या लगद्यातून Bastnaesite पुन्हा वेगळे करणे भाग असते कारण त्या भुकटीत क्षुद्र, अल्प मोलाची अन्य खनिजेही मिसळलेली असतात. अन्य खनिजांपासून Bastnaesite अलग करण्यासाठी त्या अगदी बारीक दळलेल्या भुकटीवर आणखी काही प्रक्रिया केल्या जातात. त्यासाठी, अगदी बारीक दळलेला तो लगदा एका मोठ्या हौदात घालून त्याचे प्लवनशीलन (Floatation) केले जाते. प्लवनशीलन प्रक्रियेमुळे लगद्यातील खनिजे हौदातील पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगू लागतात. त्यासाठी प्लवनशीलनाची प्रक्रिया हौदातील लगद्यावर केली जात असताना त्यांत आणखी काही रासायनिक घटक मिसळले जातात. त्यांमुळे, प्लवनशीलनाच्या प्रक्रियेखालून गेलेल्या त्या लगद्यातील Bastnaesite अन्य खनिजांपेक्षा अलग होऊन, बुडबुड्यांना चिकटून हौदाच्या तळातून वरती येत पृष्ठभागावर फेसाप्रमाणे तरंगू लागते. बुडबुड्यांना चिकटून पृष्ठभागावर तरंगणारे Bastnaesite मग खरवडून गोळा करण्यात येते.

या Bastnaesite मध्ये मिसळलेले दुर्मीळ खनिज घटक अधिक रासायनिक प्रक्रियांअंती पृथक केले जातात. प्रत्येक दुर्मीळ खनिज घटकांचे गुणधर्म निरनिराळे असतात. त्यांमुळे, Bastnaesite मधून त्यांना विलग करण्याकरता, प्रत्येक दुर्मीळ खनिज घटकासाठी वेगवेगळ्या रासायनिक प्रक्रियांचा अवलंब करणे अनिवार्य ठरते. हे एवढ्यावरच थांबत नाही. Bastnaesite मधून अलग केलेल्या विविध दुर्मीळ खनिज घटकांना त्यांची त्यांची शुद्धतेची आदर्श पातळी प्राप्त व्हावी, यासाठी

त्यांच्यावर अधिक पुढील प्रक्रिया करण्यात येतात. प्रक्रिया आणि पुनर्प्रक्रिया यांच्या साखळीतून तावून-सुलाखून निघालेले निरनिराळे दुर्मीळ खनिज घटक अंतिमत: भस्माप्रमाणे भुकटीच्या रूपात हाती येतात. अशा त्या भस्मिभूत दुर्मीळ खनिज घटकांचे अवस्थांतर धातूंमध्ये घडवून आणण्यासाठी त्यांच्यावर पुढे अधिक प्रक्रिया पुन्हा करण्यात येतात. या धातूंवर अधिक प्रक्रिया करून, पुढे, गरजेनुसार त्यांचे मिश्रधातूंमध्येही रूपांतर घडवून आणले जाते. अशा सगळ्या चक्रातून निर्माण झालेले दुर्मीळ खनिज घटक उच्च तंत्रशास्त्रीय उत्पादनव्यवस्थेमध्ये अंतिमत: वापरण्यायोग्य बनतात. उत्खनन करण्याच्या बिंदूपासून ते दुर्मीळ खनिज घटक भस्मिभूत स्वरूपात हातात येण्यासाठी अवलंबावी लागणारी प्रक्रिया-पुनर्प्रक्रिया साखळी पूर्ण होण्यास सर्वसाधारणपणे दहा दिवसांचा कालावधी लागतो. उत्खननापासून ते अंतिम प्रक्रियेपर्यंतची दुर्मीळ खनिज घटकांच्या निर्मितीची ही सारी गुंतागुंतीची कृतिपद्धती अतिशय काळजीपूर्वक अवलंबली गेली नाही तर नाना प्रकारचे पर्यावरणीय धोके संभवतात आणि उद्भवतातही. चीनने या वास्तवाचा अनुभव पुरेपूर घेतलेला आहे.

औद्योगीकरणाचा विस्तार, उद्योगांमध्ये वापरले जाणारे तंत्रज्ञान, तंत्रशास्त्रीय विकासाचा वेग आणि दिशा... अशा सगळ्या घटितांचे प्रतिबिंब दुर्मीळ खनिज घटकांचे शोधन, शुद्धीकरण, वापर आणि उपयोजन यांत डोकवलेले दिसते. अमेरिकेच्या कॅलिफोर्निया राज्यातील Mountain Pass ही खाण अगदी १९७०च्या दशकापर्यंत दुर्मीळ खनिज घटकांची जागतिक स्तरावरील सर्वांत मोठी पुरवठादार गणली जात असे. दुर्मीळ खनिज घटकांचे गुणधर्म आणि त्यांची अनोखी, एकमेवाद्वितीय वैशिष्ट्ये हा अमेरिकी विद्यापीठांतील प्राध्यापकांचा आणि विद्यार्थ्यांचा अभ्यासाच्या दृष्टीने तसेच संशोधनाच्याबाबतीतही कुतूहलपूर्ण आकर्षणाचा प्रांत एकेकाळी राहिला. या अभ्यासविषयात त्या काळात केल्या गेलेल्या संशोधनाद्वारे दुर्मीळ खनिज घटकांच्या व्यापारी, औद्योगीक तसेच सामरिक उपयोजनांसंदर्भात अतिशय मूलभूत असे दिशादर्शक काम विपुल प्रमाणावर पुढ्यात आले. परंतु, दुर्मीळ खनिज घटकांचे शोधन, विलगीकरण आणि उपयोजन यांत चीनने घट्ट पाय रोवल्यानंतर अमेरिकी बुद्धिवंतांचा या प्रांतातील रस ओसरला. त्याचवेळी दुर्मीळ खनिज घटकांचे शोधन आणि उपयोजन यापेक्षाही आर्थिक आणि व्यावसायिकदृष्ट्या लाभदायक असे संशोधनाचे अन्य प्रांतही खुले झाल्याने होतकरू अमेरिकी विद्यार्थ्यांचा ओढा तिकडे वळाला.

अमेरिकी संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी दुर्मीळ खनिज घटकांच्यासंबंधित प्रांतातून हळूहळू अन्य विषयांकडे वळते झाले तरी चीनमधील चित्र मात्र पूर्णत:

निराळेच बनत गेले. दुर्मीळ खनिज घटकांचे गुणधर्म आणि त्यांचा वापर व अनेक क्षेत्रांतील त्यांचे उपयोजन या बाबत चिनी उद्योग आणि विद्यापीठीय बुद्धिवंतांचे विश्व या दोहोंत तिथे अपरंपार आणि अवीट औत्सुक्य नांदत आले व आजही नांदते आहे. ऊर्जाविषयक संशोधनाला वाहून घेतलेल्या अमेरिकी ऊर्जा विभागाच्या प्रयोगशाळेत दरवर्षी दाखल होणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये जवळपास निम्मे विद्यार्थी चिनी असतात, ही एकच बाब, दुर्मीळ खनिज घटकांबाबत चिनी अभ्यासक, संशोधक व विद्यार्थी यांना आजदेखील वाटत असलेल्या प्रगाढ आकर्षणाचे सूचन घडविण्यास पुरेशी आहे. अमेरिकी प्रयोगशाळेत दुर्मीळ खनिज घटकांसंदर्भातील संशोधन पूर्ण करून एक चिनी विद्यार्थी मायदेशी परतला की प्रयोगशाळेत रिकामी झालेली संशोधकाची ती जागा चीनमधून आलेला दुसरा विद्यार्थी लगोलग भरून काढतो आणि या प्रक्रियेद्वारे दुर्मीळ खनिज घटकांच्या संशोधनासाठी अमेरिकी प्रयोगशाळांत प्रवेश घेणाऱ्या चिनी विद्यार्थ्यांचा ओघ आजही अखंड राहिलेला आहे. दुर्मीळ खनिज घटकांचे शोधन आणि उत्पादन यांसंदर्भातील तंत्रशास्त्रीय क्षमता चीनने ज्या प्रमाणावर विकसित केलेल्या आहेत त्यांची पायाभरणी याच प्रक्रियेद्वारे होत आलेली आहे.

दुर्मीळ खनिज घटकांचे उत्पादन तसेच त्यासाठी आवश्यक असणाऱ्या तंत्रज्ञानात्मक विकासाच्या क्षेत्रात, अमेरिकेच्या तुलनेत, चीन प्रदीर्घ काळ बराच पिछाडीवर होता. परंतु, दुर्मीळ खनिज घटकांचे मुबलक साठे आता गवसलेले असल्यामुळे या घटकांचे उत्पादन व पुरवठा या उद्योगात चीनने आता वैश्विक स्तरावर केवळ आघाडीच नव्हे तर एकाधिकारशाही प्रस्थापित केलेली आहे. साहजिकच, या क्षेत्रातील संशोधनाकडे चिनी विद्यार्थ्यांचा ओढा आजही टिकून आहे. भरीस भर म्हणून की काय, या क्षेत्रात गरजेच्या असणाऱ्या तंत्रज्ञानाच्या विकासासाठी हाती घेतलेल्या प्रयत्नांची व्यापकता चीनने आता अधिक वाढवलेली दिसते. त्यांमुळे, दुर्मीळ खनिज घटकांशी निगडित तंत्रज्ञानाच्या नवशोधात एक ना एक दिवस चीन निर्णायक प्रभुत्व प्रस्थापित करेल, असा होरा या क्षेत्रातील जाणकार व्यक्त करतात.

# आंतरराष्ट्रीय

## सोन्याच्या प्रेमात आता मध्यवर्ती बँकाही!

जागतिक स्तरावर दरवर्षी केल्या जाणाऱ्या सोन्याच्या एकंदर उत्पादनापैकी जवळपास ६० टक्के उत्पादन ज्या खाणकंपन्या करतात, अशा, सोन्याच्या उत्पादनामध्ये जगात अग्रेसर असणाऱ्या खाणकंपन्यांनी १९८७ साली 'जागतिक सुवर्ण परिषदे'ची (वर्ल्ड गोल्ड कौन्सिल) स्थापना केली. सोन्याला असलेली मागणी टिकवून धरणे, ती सतत वाढती राहील याची काळजी घेणे आणि सोनेव्यवहाराशी या ना त्या स्वरूपात ज्या सगळ्या घटकांचे हितसंबंध गुंफलेले आहेत अशा सगळ्यांच्या पदरात वर्धित मूल्य जमा करत राहणे, हे या संघटनेचे मुख्य उद्दिष्ट होय. सोन्याला असलेल्या मागणीमध्ये संरचनात्मक (स्ट्रक्चरल) स्थित्यंतरे घडत राहतील आणि विविध माध्यमांत अनेकविध प्रकारे सोन्याचा वापर सतत वाढता राहील यासाठी जे जे म्हणून करणे आवश्यक ठरते ते ते सतत करत राहणे, हा या संघटनेच्या कार्याचा केंद्रबिंदू.

त्या दृष्टीने कार्यरत असलेल्या या संघटनेच्या कार्याला विविधांगी पदर आहेत. गुंतवणुकीचा सुरक्षित आणि लाभदायक पर्याय म्हणून असणारे सोन्याचे रास्त व वास्तव महत्व जनसामान्यांना व्यवस्थित पटवून देणे आणि सोन्यामध्ये गुंतवणूक करण्याच्या निरनिराळ्या वाटा प्रशस्त बनविण्यासाठी सक्रिय राहणे, हा या संघटनेच्या कार्याचा झाला एक पैलू. सोन्यापासून तयार केलेल्या दागदागिन्यांच्या आम बाजारपेठेचे संगोपन साधत असतानाच, खास व विशिष्ट ग्राहकवर्गासाठी स्वतंत्र बाजारपेठा निर्माण करणे, हा ठरतो या संघटनेच्या कार्यकलापाचा दुसरा पैलू. सोन्याचा वापर उत्पादन प्रक्रियांमध्ये करणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाच्या विकासाच्या वाटा रुंदावण्यासाठी एकीकडे मदत करत असतानाच, उत्पादन प्रक्रियेतील एक घटक म्हणून सोन्याचा वापर करण्याच्या शक्यता पडताळून बघणाऱ्या उभरत्या नवतंत्रांना मदतीचा हातभार पुरविणे हा या संघटनेच्या कार्यपत्रिकेवरील आणखी एक विषय. जागतिक सुवर्ण परिषद राष्ट्रीय स्तरावरील समग्रलक्षी धोरणनिर्मितीमध्येही (मॅक्रो

पॉलिसी) तिच्या परीने सहभाग घेत राहते. सर्वसामान्य कुटुंबसंस्थांनी किती सोने धारण करावे या संदर्भात शासनसंस्थेने जारी केलेल्या मार्गदर्शक/नियामक तरतुदींचा काच कमी केला जावा तसेच राखीव गंगाजळीचा एक घटक म्हणून सोन्याचा अंतर्भाव केला जावा यासाठी प्रयत्नशील राहणे, अशांसारख्या मार्गांनी ही संघटना या संदर्भात झटत राहते. लंडन येथे मुख्यालय असलेली ही संघटना भारत, चीन, मध्य पूर्व तसेच अमेरिकेसारख्या सोन्याच्या महत्त्वपूर्ण व कळीच्या बाजारपेठांमध्येदेखील कार्यरत असते. सोन्याच्या वैश्विक स्तरावरील बाजारपेठेत, तसेच नानाविध सामाजिक आणि आर्थिक गतिविधींच्या माध्यमातून सोन्याला निर्माण होणाऱ्या मागणीसंदर्भात घडून येत असलेल्या स्थित्यंतरांचा अभ्यास करण्याची स्वतंत्र व्यवस्थादेखील जागतिक सुवर्ण परिषदेने विकसित केलेली आहे.

हाताशी जमा झालेली थोडीफार बचत वेचून गुंजभर सोने खरेदी करण्याची मानसिकता केवळ भारतातच नव्हे तर जगभरातील कुटुंबांमध्ये कमी-अधिक प्रमाणात आढळतेच. भारतासारख्या, सोन्याला केवळ आर्थिकच नव्हे तर अगदी सांस्कृतिक, वैद्यकीय व आध्यात्मिक आयाम लाभलेल्या देशात सणासुदीला तोळा-अर्धा तोळा सोने खरेदी करण्याचा परिपाठ आजही आवर्जून जोपासला जातो. महागाईच्या माहौलातही वास्तव मूल्यात त्या मानाने फारशी घसरण न होऊ देणारा सुरक्षित गुंतवणूक पर्याय आणि गरज पडेल तेव्हा चटदिशी (तेही पुन्हा फारसा मूल्यऱ्हास न होऊ देता) रोखीत रूपांतर घडवून आणण्याची सुलभता, अशा सोन्याच्या ठायी वसणाऱ्या उभय गुणांपायी, सोन्यामध्ये पैसा गुंतवण्याकडे आजही कुटुंबसंस्थांचा कल चांगल्यापैकी झुकलेला दिसतो. परंतु, गुंतवणुकीचा समर्थ व सुरक्षित पर्याय म्हणून सोन्याकडे आता केवळ कुटुंबसंस्थांच नव्हे तर, देशोदेशींच्या मध्यवर्ती बँकादेखील वळत असल्याचे वास्तव जागतिक सुवर्ण परिषद दरवर्षी करत असलेल्या पाहणीद्वारे पुढ्यात प्रगटते आहे. या घटिताच्या मुळाशी असणारा कार्यकारणभाव मोठा रंजक व उद्बोधक दिसतो.

जागतिक सुवर्ण परिषदेच्या अभ्यासानुसार, गेल्या सुमारे दीड-एक दशकावर नजर टाकली तर, २००९ हे वर्ष या संदर्भात लक्षणीय शाबीत होते. देशोदेशींच्या मध्यवर्ती बँका तसेच अन्य अधिकृत संस्था त्या वर्षात सोन्याच्या नक्त खरेदीदार म्हणून वावरल्या. त्या आधीच्या काळात मध्यवर्ती बँका सोने व्यवहारात उतरत त्या सोन्याच्या नक्त विक्रेत्या म्हणूनच. तत्पूर्वी बरीच वर्षे रशिया आणि बेलारूस हे दोन देश सोन्याच्या खरेदीमध्ये अग्रभागी होते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने विक्रीसाठी उपलब्ध

करून दिलेल्या त्याच्याजवळच्या एकंदर साठ्यापैकी निम्मा साठा भारत, श्रीलंका आणि मॉरिशस या तीनच देशांनी २००९ या एका वर्षात उचलला. तर, आपल्या जवळील सोन्याच्या साठ्यात २००३ ते २००९ या कालावधीत तब्बल ४५४ टनांची भर घातल्याचे चीनने २००९ सालातील एप्रिल महिन्यात जाहीर केले. फिलिपिन्स आणि व्हेनेझुएला हे देशदेखील सोनेखरेदीमध्ये २००९ साली चांगल्यापैकी आघाडीवर राहिले. विशेषत:, युरोपीय देशांच्या मध्यवर्ती बँका २००९ साल उजाडण्याआधी दोन ते तीन वर्षे, क्रमाक्रमाने, त्यांच्या जवळील सोन्याच्या विक्रीमध्ये सतत घट जारी करत राहिल्याचेही जागतिक सुवर्ण परिषदेच्या अभ्यासांद्वारे ज्ञात झालेले होते. तर, खास करून उभरत्या बाजारपेठीय अर्थव्यवस्था सोन्याच्या खरेदीमध्ये हिरिरीने उतरत असल्याचे वास्तवही तेच अभ्यास अधोरेखित करत होते. वैश्विक स्तरावरील सोने व्यवहारात नव्याने प्रगट होत असलेल्या या प्रवाहांमागील कारणे जाणून घेण्यावर, मग, जागतिक सुवर्ण परिषदेच्या अभ्यासांचा झोत वळू लागला.

**गुंतवणुकीचा सुरक्षित पर्याय**

देशाच्या राखीव गंगाजळीचे (रिझर्व्ह्ज्) व्यवस्थापन काटेकोरपणे करणे, ही कोणत्याही देशाच्या मध्यवर्ती बँकेची एक मोठी व मुख्य जबाबदारी गणली जाते. जागतिक चलन म्हणून पूर्वापार अधिमान्यता लाभलेला अमेरिकी डॉलर हा जवळपास सर्वच देशांच्या राखीव गंगाजळीचा एक अतिशय मोठा व घसघशीत असा हिस्सा राहात आलेला आहे. परंतु, त्या गंगाजळीचे भवितव्य दोन-तीन मुख्य बाबींवर अवलंबून राहते. एक म्हणजे, त्या त्या देशाचे अधिकृत चलन आणि अमेरिकी डॉलर यांच्यादरम्यानचा विनिमय दर. दुसरे म्हणजे, अमेरिका आणि त्या त्या देशाची अर्थव्यवस्था यात नांदणारी व्याजदरांची सर्वसाधारण सरासरी पातळी आणि तिसरे म्हणजे त्या त्या देशाच्या अर्थव्यवस्थेची प्रकृती. या व्यतिरिक्त अमेरिका व ते ते देश यांच्यादरम्यानच्या राजनैतिक आणि व्यापारी सहसंबंधांचादेखील प्रभाव डॉलरच्या रूपातील राखीव गंगाजळीवर जाणवत राहतोच. त्या त्या देशाच्या आर्थिक तसेच पैसाविषयक धोरणांचाही गहिरा प्रभाव विनिमय दरावर पडत राहतो.

सोन्याच्याबाबतीत मात्र चित्र निराळेच दिसते. एक तर, सोन्याचे मूल्य देशी अथवा विदेशी वित्तीय धोरणांच्या प्रभावापासून चांगल्यापैकी मुक्त राहते. गुंतवणुकीचा अतिशय सुरक्षित पर्याय हा सोन्याचा पूर्वापारचा लौकिक आजही अबाधित आहे. त्यांमुळे अकल्पित आणि/अथवा अनामिक पेचप्रसंगांपासून संरक्षण पुरविणारे हुकूमी व बुलंद चिलखत म्हणून सोन्याकडे बघितले जाते. आपल्या देशाच्या मध्यवर्ती

बँकेपाशी सोन्याचा मुबलक साठा आहे, ही बाब प्रत्येकच देशाच्या नागरिकांना सुखदायक शाबीत होते. सोन्याचा साठा चांगल्यापैकी भरभक्कम असेल तर देशाच्या मध्यवर्ती बँकेबद्दलचा त्या देशातील नागरिकांचा विश्वासदेखील चिरेबंद राहतो. ज्या देशात सोन्याच्या खाणी आहेत अशा देशांच्या मध्यवर्ती बँकांनी सोन्याच्या खरेदी-विक्रीमध्ये सक्रिय राहण्याने त्या देशातील सोने उद्योगालादेखील उज्ज्वलावस्था अनुभवास येत राहते. परंतु, देशाची राखीव गंगाजळी सोन्याच्या रूपात जतन करणे हे खर्चिकदेखील तितकेच राहते. एक तर, सोन्याची सुरक्षाच कसोटी बघणारी असते. त्याची ने-आण तितकीच जोखमीची ठरते. त्याचा विमा उतरवणे भागच असते. दुसरे म्हणजे, सोन्याच्या साठ्यांचे व्यवस्थापन करणे, ही विशेष कौशल्याची व क्षमतांची मागणी करणारी बाब गणली जाते. त्यासाठी विशिष्ट ज्ञान व अनुभवाने समृद्ध व्यावसायिक व्यवस्थापक नियुक्त करावे लागतात. सोने उधार दिले तर त्यांवर मिळणाऱ्या व्याजाचा सरासरी दर हा अन्य मालमत्ता अगर जिनसा उधार दिल्यास त्यांवर मिळू शकणाऱ्या सरासरी व्याजदरापेक्षा कमीच राहतो. देशापाशी असलेला सोन्याचा साठा हा त्या त्या देशातील नागरिकांच्या अतीव जिव्हाळ्याचा असा अतिशय संवेदनशील विषय असल्याने सोन्याच्या साठ्यात कपात करण्यासारखे निर्णय घेण्याची वेळ आली तर त्या संदर्भात घाईघाईने निर्णय घेऊन त्यांची लगोलग अंमलबजावणी करणे अतिशय नाजूक ठरते.

या सगळ्यांपायी, देशापाशी असणाऱ्या सोन्याच्या साठ्यात वाढ घडवून आणायची की घट, राखीव गंगाजळीमध्ये सोन्याचे प्रमाण कितपत असावे, त्या प्रमाणात बदल घडवून आणावा की नाही... यांसारखे संवेदनशील निर्णय देशोदेशींच्या मध्यवर्ती बँका त्या संदर्भातील सर्व साधक-बाधक बाबींचा चौफेर अंदाज घेऊनच घेत राहतात. पुन्हा, असे निर्णय निखळ व्यावसायिक निकषांनुसार घेता येत नसतात. त्या त्या देशात त्या त्या वेळी प्रचलीत असणारे राजकीय वास्तव, अर्थव्यवस्थेच्या पुढ्यातील आव्हाने यांच्या पार्श्वपटाचाही औरसचौरस विचार करणे आवश्यक ठरते. मध्यवर्ती बँकेपाशी असलेल्या सोन्याच्या साठ्यात खरेदीद्वारे भर घालावयाची की विक्रीद्वारे साठ्यात कपात साधायची यांबाबतचे तारतम्य देशाच्या आर्थिक स्थितीमधील बदलत्या कलांनुसार डोळ्यांत तेल घालून राखावे लागते. देशातील प्रचलीत आर्थिक तसेच वित्तीय परिस्थितीनुसार सोन्याच्या खरेदी अगर विक्रीशी आनुषंगिक लाभालाभांच्या काट्याचा कल बदलत राहतो. परंतु, केवळ देशी अर्थकारणाच्या प्रकृतिमानावरच सोनेधारणासंदर्भातील धोरणे सर्वस्वी निर्भर असतात,

असाही अर्थ यातून निघत नाही अथवा काढता येत नाही. एकंदर जागतिक अर्थकारणाचे प्रवाह कसे आहेत, नजीकच्या भविष्यात त्या प्रवाहांचे रागरंग कसे राहतील अशांसारख्या बाबींचा प्रभावदेखील सोनेधारणाबाबतच्या धोरणदृष्टीवर पडत असतो.

साधारणपणे गेल्या चार दशकांचा मागोवा घेतला तर ही वस्तुस्थिती अधिक स्पष्ट होईल. १९८०च्या संपूर्ण दशकात देशोदेशींच्या मध्यवर्ती बँकांचा सर्वसाधारण कल त्यांच्यापाशी असलेल्या सोन्याच्या साठ्यात बदल घडवून न आणण्याकडेच राहिला. जवळपास दीड दशक सर्वत्र सरासरीने तीच मानसिकता त्या काळात नांदती राहिली. १९९०च्या दशकाच्या मध्यानंतर मात्र तिच्यात बदल होण्याच्या दिशा उजळायला लागल्या. १९८०च्या दशकादरम्यान अनेक देशांमध्ये आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा अंगीकार केला गेलेला होता. त्या बदलांचे बऱ्यापैकी अनुकूल परिणाम १९९०च्या दशकाच्या उत्तरार्धात दिसायला सुरुवात झालेली होती. सगळ्या अर्थव्यवस्थांची प्रगतीची गती कमी-अधिक फरकाने चांगली मजबूत राहू लागली. अर्थव्यवस्थांना बसणाऱ्या अवचित हेलकाव्यांची वारंवारता व तीव्रताही मावळली. त्यांमुळे, अनपेक्षित चढ-उतारांपासून संरक्षण करणारे कवच म्हणून सोन्यामधील गुंतवणुकीकडे असलेला मध्यवर्ती बँकांचा ओढा ओसरायला लागला. सोन्याच्या साठ्यांमध्ये बदल घडवून आणण्यास मध्यवर्ती बँका अनुत्सुक राहिल्याने सोन्याला असणारी मागणीदेखील स्थिर होती. या सगळ्यांपायी सोन्याचे बाजारभावदेखील नरमाईचा कल दाखवू लागले. मुळात, कर्जाऊ दिलेल्या सोन्यावरील व्याजदर तसे अनाकर्षक त्यांत पुन्हा सोन्याचे बाजारभावही नरम राहू लागल्याने ज्या देशांच्या मध्यवर्ती बँकांपाशी सोन्याचे भरघोस साठे होते त्यांचा कल १९९०च्या दशकाच्या मध्यापासून सोनेविक्रीकडे झुकू लागला. तर, बेतासबातच सोने पदरी बाळगणाऱ्या देशांच्या मध्यवर्ती बँकांनी नव्याने सोनेखरेदीबाबत आस्ते चलोचे धोरण अवलंबले.

**सोनेविषयक धोरणाचा फेरविचार**

मध्यवर्ती बँकांचे सोन्याबाबतचे हे धोरण २१व्या शतकातील पहिल्या दशकाच्या मध्यापर्यंत स्थिर राहिले. वास्तविक पाहता, २१व्या शतकातील त्या पहिल्या दशकामध्ये जागतिक अर्थकारणाला तीन धक्के कमी-अधिक तीव्रतेने बसलेले होते. २००० साली अमेरिकेतील अनेक 'डॉट कॉम' कंपन्या बुडाल्या. डॉलरचा मूल्यऱ्हासही २००२ सालापासून जाणवू लागला. आणि, २००१ सालातील ११ सप्टेंबर रोजी जागतिक व्यापार संघटनेच्या न्यूयॉर्क येथील जुळ्या मनोऱ्यांवर इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी घडवून आणलेल्या दहशतवादी हल्ल्याने सर्वत्र सघन भयाचे आणि त्यांतून निपजणाऱ्या

अस्थिरतेचे वातावरण व्यापून राहिले. परंतु, हे धक्के पचवूनही जागतिक अर्थव्यवस्थेची वाटचाल दमदार गतीने होत राहिल्याने सोनेधारणासंदर्भातील धोरणांत मूलभूत बदल घडवून आणण्याची निकड मध्यवर्ती बँकांना भासली नाही. पण म्हणून त्या काळात कोणत्याच मध्यवर्ती बँकांनी सोने अजिबातच खरेदी केले नाही, असेही म्हणता येणार नाही. कारण, त्या सगळ्या काळातही पोलंड, फिलिपिन्स, चीन, बेलारूस आणि मुख्यत: अर्जेन्टिनासारखे काही देश थोड्याफार प्रमाणात सोनेखरेदीद्वारे त्यांच्या साठ्यांत भर घालत होतेच.

परंतु, २१व्या शतकाचे पहिले दशक मध्यावर आल्यानंतर सोन्याबाबतच्या मध्यवर्ती बँकांच्या तिथवरच्या धोरणाचा फेरविचार हळूहळू उगम पावायला लागला. त्याच्या मुळाशी मुख्यत: दोन कारणे राहिली. एक तर, त्या पहिल्या दशकातील सातत्यशील दमदार आर्थिक वाटचाल मुख्यत: सुलभ कर्जपुरवठ्याद्वारे तगवून धरलेल्या बाजारपेठीय मागणीच्या भरवशावर चालू राहिलेली होती. सुलभ व्याजदराने होत राहिलेल्या पैशाच्या पुरवठ्याचे अनिष्ट परिणाम महागाईच्या चढत्या कमानीद्वारे दृग्गोचर होऊ लागलेले होते. दुसरे म्हणजे, सुलभ रोखतेची ऊब मिळून अर्थकारणाला आलेली ती भरारी कितपत टिकाऊ आहे याबाबत सगळीकडेच संशयाचे वातावरण दाटू लागले. दुसरे म्हणजे, जागतिक स्तरावर, मुख्यत: अमेरिका आणि चीन या दोन महाकाय अर्थव्यवस्थांमध्ये व्यापाराच्या माध्यमातून जे एक प्रगाढ असंतुलन निर्माण झालेले होते त्यांपायीदेखील एक प्रकारची सघन अस्वस्थता धोरणकर्त्यांमध्ये मूळ धरायला लागलेली होती.

सगळीकडे अशी मानसिकता दाटलेली असतानाच २००८ सालातील सप्टेंबर महिन्याच्या १५ तारखेस लेहमन ब्रदर्स या बलाढ्य अमेरिकी कंपनीने दिवाळे जाहीर केले आणि 'सबप्राइम' कर्जांचा फुगा फुटला. सगळी जागतिक अर्थव्यवस्थाच मग अनिश्चिततेच्या व मंदीच्या गर्तेत लोटली गेली. 'सबप्राइम' कर्जांच्या संकटाचा पायरव २००७ सालापासूनच ऐकायला येऊ लागलेला असल्याने देशोदेशींच्या मध्यवर्ती बँका तेव्हापासूनच सावधगिरीच्या पवित्र्यात गेलेल्या होत्या. २००८ सालातील वित्तीय अरिष्टाने संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेलाच त्याच्या कवेत घेतले आणि सोनेधारणासंदर्भातील मध्यवर्ती बँकांच्या धोरणाची दिशा १८० अंशांतून फिरली. युरोपीय मध्यवर्ती बँकांनी तिथवर जारी राखलेला सोनेविक्रीचा परिपाठ बंद केला; तर, चीन, भारत, श्रीलंका यांसारख्या देशांनी हिरिरीने सोने खरेदी करून सोन्याचा आपला साठा बळकट बनवण्याकडे मोहरा वळवला.

देशोदेशींच्या मध्यवर्ती बँकांना सोन्याबद्दल वाटणाऱ्या प्रेमाला भरते येण्यास आणखी एक कारण ठरले आणि तो म्हणजे डॉलरची साठेबाजी करण्याचा काही देशांचा – खास करून चीन व रशिया यांचा – पवित्रा. अमेरिकी डॉलर हा जगभरात सर्वत्रच राखीव गंगाजळीचा एक अतिशय महत्त्वाचा घटक पूर्वापारच राहात आलेला आहे. अमेरिकी अर्थव्यवस्थेची मजबुती हे त्यांमागील एक प्रमुख कारण. त्यांमुळे, जगभरातील बहुतेक सर्वच देशांच्या मध्यवर्ती बँका राखीव गंगाजळीचा एक मोठा हिस्सा कायमच अमेरिकी डॉलरच्या स्वरूपात राखत आलेल्या आहेत. १९८०च्या दशकापासून निर्यातप्रधान आर्थिक विकासाचे प्रारूप स्वीकारलेल्या चीनचा सर्वांत मुख्य व्यापारी भागीदार अमेरिका राहिली. अमेरिकी कंपन्यांची थेट गुंतवणूक आणि त्यांनीच पुरविलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान यांच्या बळावरच वस्तुनिर्माण उद्योगाचे वैश्विक केंद्र म्हणून चीन त्याचे स्थान अजोड बनवू शकला. याचा परिणाम म्हणून चीन आणि अमेरिका यांच्यादरम्यानच्या व्यापारात चीनच्या खात्यावर सतत व्यापारी आधिक्यच (ट्रेड सरप्लस) जमा होत राहिले. त्यांमुळे, चिनी राखीव गंगाजळी कायमच अमेरिकी डॉलर्सच्या थप्प्यांनी ओसंडून वाहत आलेली आहे. हे अमेरिकी डॉलर चीन पुन्हा अमेरिकी शासनसंस्था विक्रीस काढत राहिलेल्या कर्जरोख्यांमध्येच गुंतवत गेला. त्यांमुळे, अमेरिकी अर्थव्यवस्थेच रोखतेला भरती कायम राहून त्याची एक अनिष्ट आणि गंभीर परिणती उभ्या जगाला भोगावी लागली ती 'सबप्राइम' कर्जांचा फुगा फुटण्याच्या रूपाने. राखीव गंगाजळीमध्ये अमेरिकी डॉलर्सचे निर्माण झालेले अतिरिक्त वर्चस्व आणि त्यांपायी गंगाजळीचा ढासळलेला तोल सावरण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून आता अनेक देशांच्या मध्यवर्ती बँकांनी सोन्याकडे पुन्हा मोहरा वळवलेला आहे.

**राखीव गंगाजळींची पुनर्रचना**

अर्थात, याला अन्य कारणेही आहेतच. एक तर, अमेरिकी डॉलर्सच्या स्वरूपात देशी अर्थव्यवस्थेमध्ये प्रवेशणारा निधीस्रोत बऱ्यापैकी चंचल असतो. त्या त्या देशाच्या अर्थव्यवस्थेतील चढ–उतार आणि/अथवा अमेरिकी अर्थव्यवस्थेतील तेजी – नरमी यांनुसार त्या त्या अर्थव्यवस्थांमध्ये प्रवेशलेल्या डॉलर्सच्या स्वरूपातील निधींचे चलनवलन बदलत राहते. थोडक्यात, विविध अर्थव्यवस्थांमध्ये 'पार्क' करून ठेवलेले अमेरिकी डॉलर तिथून केव्हाही त्यांचा पाय काढून घेऊ शकतात, याचा अनुभव सगळ्यांच देशांनी वेळोवेळी घेतलेला आहे. तसे झाले रे झाले की संबंधित अर्थव्यवस्थांमधील बाजारपेठांमध्ये बुडबुडे तयार होण्याची आणि फुटण्याची

साखळी विणली जाऊ लागते. त्यांमुळे, राखीव गंगाजळीमध्ये सतत टिकून राहिलेला अमेरिकी डॉलरचा वरचष्मा घटवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून अनेक देशांच्या मध्यवर्ती बँका आता पुन्हा सोन्याकडे वळताना दिसतात. सोन्यामधील गुंतवणूक त्या मानाने अतिशय सुरक्षित गणली जाते आणि भाववाढीचा माहौल भरात राहिला तरी त्या मानाने सोन्याच्या वास्तव मूल्यात फारशी घट होत नाही, ही सोन्याची दोन मुख्य बलस्थाने या संदर्भात कायम नजरेसमोर ठेवली जातात. अशा वाढत्या मागणीपायी सोन्याच्या बाजारभावांतदेखील अलीकडील काळात वाढ होत जाते आहे. त्यांमुळे, सोने विक्रीस काढण्याऐवजी सोन्याचा साठा करून ठेवण्याच्या मानसिकतेला खतपाणीच मिळते आहे. सोन्याचे बाजारभाव कोणा एखाद्या अथवा मूठभर देशांच्या वित्तीय किंवा आर्थिक धोरणांमधील अथवा पैसा धोरणांतील फेरफारांवर नव्हे तर, वैश्विक स्तरावर त्याला असणारी मागणी आणि त्या तुलनेत असणारा पुरवठा या दोहोंवर अवलंबून असतात. त्यांमुळे, त्यांत अनपेक्षित अथवा अतर्क्य प्रकारे बदल घडून येण्याच्या शक्यता त्या मानाने कमी राहतात. सोन्याबाबतचे आकर्षण वाढण्यामागे हेदेखील एक सबळ कारण गणले जाते.

...आणि, मध्यवर्ती बँकांनाही सोन्याचा सोस जडण्यास अगदी अलीकडे कारणभूत ठरणारा घटक म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेत सर्वत्रच दाटत चाललेले अस्थिरतेचे


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

आणि अनिश्चिततेचे गडद मळभ. देशोदेशींच्या मध्यवर्ती बँकांनी प्रत्येक वर्षी जवळपास एक हजार टन या गतीने गेल्या तीन वर्षांत सोन्याच्या त्यांच्याजवळील साठ्यात भर घातल्याचे संबंधित आकडेवारी दर्शविते. त्या आधीच्या दहा वर्षांवर नजर टाकली तर मध्यवर्ती बँका त्या सगळ्या काळात दरवर्षी सरासरी ४०० ते ५०० टन सोने खरेदी करत असत. मग, त्या तुलनेत, दर वर्षी एकदम दुपटीपेक्षा अधिक सोने गेली सलग तीन वर्षे खरेदी करण्याचा सपाटा मध्यवर्ती बँकांनी आता का लावला असावा याचे कुतूहल वाटणे अगदी साहजिकच आहे.

या संदर्भात, जागतिक सुवर्ण परिषदेने अनेक देशांच्या मध्यवर्ती बँकांच्या संबंधित सूत्रांकडून संकलित केलेला प्रतिसाद अतिशय बोलका आहे. वैश्विक स्तरावरील महागाईचा तेवर येत्या काळात चढा राहील, असा अंदाज अनेक मध्यवर्ती बँकांच्या राखीव गंगाजळीचे व्यवस्थापक व्यक्त करतात. त्या संभाव्य महागाईपासून बचाव करणारे हुकूमी चिलखत म्हणून सोने खरेदी करून राखीव गंगाजळीत जमा करण्याकडे मध्यवर्ती बँकांचा कल दिसतो. दुसरे म्हणजे, इराण आणि इस्त्रायल व अमेरिका, इस्त्रायल आणि 'हमास', युक्रेन आणि रशिया यांच्यातील धुमसत्या संघर्षांपायी जागतिक पातळीवर एकंदरीनेच जी युध्यमान परिस्थिती सध्या नांदते आहे तिच्यापायी सर्वत्र असुरक्षिततेची भावना आहे. तिच्यातून निपजणाऱ्या अनिश्चिततेपासून देशी अर्थव्यवस्थांचे व चलनांचे संरक्षण करण्यासाठी सोन्याचा आधार मध्यवर्ती बँकांना गरजेचा वाटतो. तिसरे म्हणजे, अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये आयात केल्या जाणाऱ्या जिनसांवर जबरी आयात शुल्के आकारण्याच्या ट्रम्प यांच्या धोरणांपायी जी व्यापारी युद्धे भडकण्याची दाट शक्यता दिसते त्यांचे हबके देशी अर्थव्यवस्थांना बसू नयेत यासाठी सोन्याच्या खरेदीकडे मध्यवर्ती बँका जोरात वळत आहेत.

एकूण काय तर, दोलायमान परिस्थितीच्या काळात कोणत्याही प्रकारची जोखीम स्वीकारण्याच्या मानसिकतेमध्ये नसणारे तुम्ही – आम्ही ज्या प्रमाणे स्वत:जवळची बचत सोन्यामध्ये गुंतवणे सुज्ञपणाचे समजतो त्याच धर्तीवर आज मध्यवर्ती बँकादेखील सोन्यामधील गुंतवणूक दीर्घकालीन मूल्यसंगोपनाच्या दृष्टीने सुरक्षित समजत आहेत. 'जे पिंडी ते ब्रह्मांडी' असे म्हणले जाते ते काही खोटे नाही!

# जिकडे-तिकडे

## (१) नव्या पिढीसाठी आरोग्य वरदान!

आनुवंशिक आजारांमुळे होणारे अर्भकांचे मृत्यू ही एक जागतिक समस्या आहे. वैद्यकीय तंत्रज्ञान खूप वेगाने प्रगत होत असले तरीदेखील काही आजार असे आहेत की ज्यावरचे उत्तर अद्याप सापडलेले नाही. परंतु अलीकडेच ब्रिटनमध्ये झालेल्या एका नव्या संशोधनाने आनुवंशिक आजारांपायी मृत्युमुखी पडण्याचे भय असणाऱ्या नवजात अर्भकांचा जीव वाचू शकेल अशी आशादायी शक्यता निर्माण झालेली आहे. त्यामुळेच नव्या पिढीसाठी हे नवे संशोधन म्हणजे आरोग्याचे वरदान ठरेल अशी आशा अभ्यासकांकडून व्यक्त होते आहे.

Mitochondria हे आपल्या शरीरातील प्रत्येक पेशीतील अगदी लहान भाग असतात. त्यांना पेशींचे ऊर्जाघर असेही म्हटले जाते. कारण अन्नातून ऊर्जा निर्माण करण्याचे काम ते करतात. त्यांच्या कार्यात किंवा रचनेत जेव्हा बिघाड निर्माण होतो तेव्हा त्याला Mitochondrial Disease असे म्हणतात. हा रोग मुख्यत्वे जनुकीय दोषांमुळे उद्‌भवतो. अनेकदा हा रोग नवजात अर्भकांमध्ये त्यांच्या आईकडून येतो. त्यामुळे बहुतांश वेळेला हा रोग आनुवंशिक असतो. या रोगाची लक्षणे व्यक्तीपरत्वे वेगळी असतात आणि त्याचा परिणाम शरीराच्या कोणत्या अवयवांवर होतो आहे यानुसार ती लक्षणे ठरतात. प्रामुख्याने थकवा वाटणे व ऊर्जा कमी जाणवणे, स्नायूंमध्ये वेदना जाणवत राहणे, स्नायूंची ताठरता कमी होणे, वाढ न होणे व वजन न वाढणे, झटक्यांचे विकार, दृष्टीदोष किंवा दृष्टिहीनता, श्रवणदोष, हृदयाचे आजार, यकृताचे व मूत्रपिंडांचे कार्य बिघडणे, मेंदूवर परिणाम होऊन मानसिक विकृती निर्माण होणे अशी विविध प्रकारची लक्षणे या आजारापायी दिसून येतात. हा एक दुर्मिळ परंतु जागतिक स्तरावरचा आजार आहे. आजच्या घडीला या आजारावर ठोस असे औषध उपलब्ध नाही. त्याची लक्षणे ज्या रुग्णांमध्ये दिसून येतात त्यांना मात्र त्यानुसार, डॉक्टर उपचार देतात. पूरक पोषकद्रव्ये, अन्नातून योग्य पोषण

देण्याचा प्रयत्न करणे, झटके येऊ नयेत म्हणून प्रतिबंधात्मक औषधे, 'फिजिओथेरपी' व व्यायाम या गोष्टींचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जातो. हा आजार आनुवंशिक असल्याने ज्या कुटुंबात हा आजार आहे त्यांनी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असते. हा आजार काहीसा गुंतागुंतीचा असतो. त्यामुळे लक्षणांवरील आधारित उपचार अचूक आणि योग्य रीतीने झाले तर चांगले जीवनमान जगता येते. मात्र या संबधात जागतिक पातळीवर अधिकाधिक चांगले संशोधन व्हावे अशी अपेक्षा होती. त्याप्रमाणे, आरोग्यक्षेत्रात संशोधन करणारे जगभरातील संशोधक त्यावर काम करीत होते. ब्रिटनमधील संशोधकांना त्यावर तोडगा काढण्यात यश मिळालेले आहे.

या रोगाचे जगभरातील स्वरूप पाहता, Mitochondrial Disease हा रोग आढळण्याचे प्रमाण नवजात बालकांत दोन टक्के इतके दिसते. काही वेळेला एकाच कुटुंबातील अनेकांना हा आजार झाल्याचेही काही उदाहरणांतून समोर आले आहे. युरोप आणि अमेरिकेमध्ये या रोगावर यापूर्वी संशोधन करण्यात आले आहे. या रोगाचे निदान होण्याची साधने विकसनशील आणि गरीब देशांमध्ये नसल्याने आफ्रिका, आशिया व लॅटिन अमेरिका या खंडात या रोगाचे वास्तविक स्वरूप किती मोठे आहे याचा पुरेसा अंदाज येत नाही. वेळेवर निदान न झाल्याने हा रोग अनेकदा गंभीर स्वरूप धारण करतो असे दिसून आले आहे. आजवर जगभरात केवळ लक्षणांवर उपचार केले जात असल्याने या रोगावर कायमस्वरुपी ठोस औषध उपलब्ध नाही. म्हणूनच अशा रुग्णांना मदतीचा हात देता यावा म्हणून Mitochondrial Disease Foundation या नावाची संस्था स्थापन केलेली आहे. तसेच, National Institute for Health (USA), MITO Foundation (Austrelia) अशा संस्थांच्या माध्यमातून या रोगासाठी निधीसुद्धा उपलब्ध करून दिला जातो. आजही अनेक देशांमध्ये नवजात बालक उपचार विभाग तसेच बालरोग विभागांमध्ये या रोगाचे निदान होत नाही. त्याविषयी पुरेशी जनजागृती झालेली नसल्याचे लक्षात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर ब्रिटनमध्ये झालेले नवे संशोधन खचितच मोलाचे ठरणारे आहे.

ब्रिटिश संशोधकांनी या रोगाच्या संदर्भात संशोधन व उपचार करताना काही माता-पित्यांवर प्रयोग केले. त्यातून जन्माला आलेली बाळे ही या असाध्य रोगापासून मुक्त राहू शकतील अशी आहेत. भविष्यातही या बाळांना हा आजार होण्याची शक्यता नाही. त्यामुळेच ब्रिटनमधील हे नवे संशोधन जागतिक संदर्भात अतिशय महत्त्वाचे आणि मोलाचे मानले जाते आहे. ब्रिटनमधील Newcastle University

आणि न्यूकॅसल रुग्णालयाच्या NHS Foundation Trust यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दहा वर्षांपासून या विषयावर संशोधन सुरू होते. या प्रयोगामध्ये मातेच्या शरीरातील बीजांडे व पित्याच्या शरीरातील वीर्य यांना अन्य एका असलेल्या महिलेच्या बीजांडांमध्ये मिसळले जाते. अशा तीन व्यक्तींच्या संमीलनातून बाळ जन्म घेते. त्या बाळातील जनुके ही त्याच्या आई-वडिलांसारखीच असतात. फक्त ०.१ टक्का जनुके ही तिसऱ्या व्यक्तीकडून म्हणजेच बीजांडे दान केलेल्या महिलेकडून आलेली असतात. ही बिजांडे पुढच्या पिढ्यांमध्येही संक्रमित होत जातात आणि त्यामुळे हा रोग होण्याचे प्रमाण कमी होते व संबंधित आनुवंशिक रोगापासून मुक्ती मिळवणे शक्य होऊ शकते, असा दावा या प्रयोगात सहभागी संशोधकांनी केला आहे. या यशस्वी प्रयोगातून आजवर आठ बाळे जन्माला आलेली आहेत. ब्रिटनमधील प्रख्यात बालरोगतज्ज्ञ Bobby McFarland हे या प्रयोगाविषयी अत्यंत समाधानी आहेत. त्यांच्या मते, हे संशोधन क्रांतिकारी ठरू शकेल. उद्याची पिढी आरोग्यदायी व्हावी या दृष्टीने हे महत्त्वाचे संशोधन नक्कीच आहे.

अर्थात, या प्रयोगासाठी वापरलेले तंत्रज्ञान हे ब्रिटनमध्ये अधिकृत असले तरी त्याचे उपयोजन सार्वत्रिक होऊ शकेल असे मात्र नाही नाही. ब्रिटनमध्ये अशा पद्धतीने बाळांना जन्म देण्याची पद्धत कायद्याने मान्य असल्याकारणाने त्यांना तशा पद्धतीचा उपयोग करता येऊ शकतो. परंतु अनेक देशांमध्ये त्याला परवानगी नसल्या कारणाने मर्यादा येऊ शकतात. त्यामुळे या नव्या पद्धतीचा आणि संशोधनाचा सार्वत्रिक वापर करता येईल का या विषयीसुद्धा अनेक संशोधकांच्या मनात साशंकता आहे. मात्र हे संशोधन अगदी निश्चितपणाने जागतिक स्तरावर उपयुक्त ठरू शकते असेही मत संशोधकांचा दुसरा गट व्यक्त करताना दिसतो.

Mitochondrial Disease या रोगावर औषध उपलब्ध नसले तरी त्याचा प्रसार आपण निश्चितपणे रोखू शकतो हा दिलासा या नव्या संशोधनातून नक्कीच मिळाला आहे. येणाऱ्या पिढ्यांसाठी हे संशोधन म्हणजे एक वरदान ठरावे, असा दावा संशोधकांनी व्यक्त केला. काही संशोधकांच्या मते या प्रयोगाच्या माध्यमातून जो मार्ग सापडला आहे, त्या धर्तीवर आणखी काही प्रयोग करून इतर आनुवंशिक रोगांवर काही उपाय किंवा लागू पडणाऱ्या मात्रा सापडतात का याचा शोध घेणे अधिक सुकर होणार आहे. कोणत्याही रोगापासून मुक्त असणाऱ्या अशा पूर्णपणे निरोगी बालकांना जन्म देणे भविष्यात शक्य होऊ शकेल का, या दिशेने जाण्याची सुरुवात म्हणजे हे संशोधन ठरू शकते, असा आशावाद आता संशोधकांकडून व्यक्त होतो आहे. ■■

# (२) आत्मनिर्भर अवकाश युगाची सुरुवात!

यशस्वी अवकाश मोहिमांच्या माध्यमातून अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) स्वत:चे चांगले स्थान निर्माण केलेले आहे. या अवकाश मोहिमांच्या माध्यमातून भारताने आपल्या विज्ञान, संशोधनातील क्षमतांचे आणि सामर्थ्याचे दर्शन घडवलेले आहे. चांद्रयान मोहिम, 'मिशन' मंगळ या सारख्या यशस्वी मोहिमांमुळे अवकाश संशोधनाच्या क्षेत्रातील एक उभरती सक्षम शक्ती अशी भारताची एक चांगली प्रतिमा अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात जगात निर्माण झालेली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर भारत स्वत:ची पायवाट आखू पाहतो आहे. मोठ्या अवकाश मोहिमा राबवताना आणि अंतराळात आपल्या अंतराळवीरांना पाठवण्यासाठी आज असणारे अवलंबित्व कमी होणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी आता स्वत:चे अवकाशस्थानक साकारण्याचे स्वप्न भारत पाहतो आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणजे देशाच्या आत्मनिर्भर अवकाश युगाची सुरुवात ठरू शकणार आहे.

गेल्या सात दशकांपासून भारताच्या अवकाश संशोधनक्षेत्रात भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्रो) मोलाची कामगिरी बजावते आहे. सर्व प्रतिकूल परिस्थितींवर मात करीत 'इस्रो'ने उपग्रह प्रक्षेपणापासून सुरुवात केली. सुरुवातीला पायाभूत सुविधा नसतानादेखील 'इस्रो'ने या क्षेत्रात आपले पाय भक्कमपणे रोवले आणि चांद्रयान, मंगळयान, सौरयान अशा विविध मोहिमांतून भारताचा दमदार ठसा या क्षेत्रात उमटवला. या सगळ्यातून जो एक भक्कम पाया उभा राहिलेला आहे त्याच्या बळावर आता भारताने हे पुढचे पाऊल उचलण्याची तयारी सुरू केलेली आहे. भारतीय अंतराळ स्थानक हे भारताच्या अवकाश क्षेत्रातील योगदानातील एक महत्त्वाचे पर्व ठरणार आहे.

अगदी नुकतेच भारतातील अतंराळवीर शुभांशु शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकामध्ये १८ दिवसांचा मुक्काम करून आनंदाने पृथ्वीवर पुनरागमन केले.

त्यामुळे आता भारताच्या अवकाश स्थानक उभारण्याच्या आशा पल्लवित झालेल्या आहेत. भारताचे अवकाश स्थानक उभारण्याचे पाऊल म्हणजे केवळ तांत्रिक प्रगतीचे द्योतक नसून भारताच्या आत्मनिर्भरतेचा, संशोधनक्षमतेचा आणि जागतिक नेतृत्वाच्या दिशेने होणाऱ्या वाटचालीचा भाग आहे. भारताचे स्वतंत्र अवकाश स्थानक येत्या दशकभरात २०३५ सालापर्यंत साकारण्याचे उद्दिष्ट असून या स्थानकामुळे भारताला दीर्घकालीन अवकाश संशोधन मोहिमा, सूक्ष्म गुरुत्वीय संशोधन आणि जागतिक अंतराळ सहकार्याच्या नव्या संधी प्राप्त होऊ शकणार आहेत.

सध्या अवकाशामध्ये अमेरिका, रशिया आणि चीन या महासत्तांची अवकाश स्थानके अंतराळात कार्यरत आहेत. अंतराळातील अनेक महत्त्वाच्या शोधांना इथूनच दिशा मिळते आहे. तसेच अंतराळवीर तिथे राहून अवकाशातील अनेक महत्त्वाची संशोधने साकारत आहेत. त्या पार्श्वभूमीवर, येणाऱ्या काळात अवकाश संशोधनाची व्याप्ती आणखी वाढत जाणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसते आहे. भारताला स्वत:च्या अवकाश स्थानकाची गरज भासणारच आहे. दीर्घकालीन अवकाश संशोधन करण्यासाठी भारताला आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकांवर अवलंबून राहावे लागते आहे.

'इस्रो'च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाची स्थापना २०२८ साली करण्याची घोषणा भारताने केली आहे. परंतु त्यातून प्रत्यक्ष अंतराळवीरांना पाठवण्याची सुसज्जता येण्यासाठी साधारणत: दहा वर्षांचा कालावधी लागेल असा अंदाज आहे. तोपर्यंत त्या अवकाशस्थानकातून प्रयोग करता येतील आणि उपग्रह प्रस्थापित करता येतील. दिनांक १९ एप्रिल १९७१ रोजी तत्कालीन सोव्हिएत रशियाने 'सॅल्यूट वन' या नावाचे पहिले अवकाशस्थानक सोडले होते. हे अवकाशस्थानक त्या काळी २० टन वजनाचे होते. अवकाशातून पृथ्वीची चित्रे टिपणे आणि अंतराळवीरांच्या स्थितीचा अभ्यास करणे या प्रमुख उद्देशाने या अवकाश मोहिमांचे आयोजन करण्यात आले होते. आजमितीला आपल्या अंतराळामध्ये दोन अवकाशस्थानके सक्रिय असून त्यातील पहिले NASA च्या माध्यमातून कार्यरत असलेले 'इंटरनॅशनल स्पेस स्टेशन' (आयएसएस) आणि चीनचे Tiangong ही आहेत. अवकाशात राहून तिथे महत्त्वाची संशोधने करण्यासाठी आणि दीर्घकाळ अंतराळात राहून संशोधन करण्यासाठी अशा अवकाशस्थानकांची जरुरी भासते. सद्य:स्थितीत मात्र भारताला इतरांवर अवलंबून राहावे लागत असल्याने मोठ्या अवकाश मोहिमा हाती घेणे शक्य होत नाही. या शिवाय, अवकाश संशोधन हे केवळ वैज्ञानिक संशोधनापुरते मर्यादित नाही तर त्या माध्यमातून राष्ट्रीय सुरक्षा आणि सामरिक दृष्टिकोनातूनही ते

महत्त्वाचे आहे. त्यामुळे देशाचे अंतराळ धोरण निश्चित करत असताना त्यात आत्मनिर्भरता व स्वातंत्र्य येण्यासाठी हे पाऊल अतिशय महत्त्वाचे ठरणार आहे. त्याशिवाय, इतरांच्या अवकाशस्थानकांची मदत न घेता स्वतंत्रपणे अवकाश मोहिम राबवता आली तर त्यातील इतर देशांचा हस्तक्षेप कमी होणार आहे. म्हणूनच भारताचे अवकाशस्थानक लवकर साकारणे गरजेचे आहे, अशी भारतीय अंतराळ संशोधकांची आग्रही भूमिका आहे.

'इंटरनॅशनल स्पेस स्टेशन' (आयएसएस) हे पाच देशांच्या समन्वयाचे कार्यान्वित केले जाते. त्यामध्ये अमेरिका, रशिया, जपान, कॅनडा, युरोप येथील पाच प्रमुख अवकाश संशोधन संस्था सहभागी आहेत. या अवकाशस्थानकामध्ये व्यायामासाठी व आरामासाठी जागा, स्नानगृह, ३६० अंशामध्ये दिसू शकेल अशी खिडकी यांचा समावेश आहे. सन २००० पासून या अवकाशस्थानकामध्ये अंतराळवीर जाऊ लागले आहेत आणि मर्यादित काळासाठी तिथे मुक्काम करू लागले आहेत. या काळात हे अंतराळवीर तिथे राहून विविध ग्रहांचा अभ्यास करतात आणि अनेक प्रयोगही करून पाहतात. हे अवकाशस्थानक अवघ्या ९० मिनिटांमध्ये पृथ्वीची प्रदक्षिणा पूर्ण करते व त्याचा वेग ताशी २८ हजार किलोमीटर इतका प्रचंड असतो. या अवकाशस्थानकात जाऊन राहायचे व त्यासाठी स्वत:ला तयार करायचे यासाठी अंतराळवीरांना खास प्रशिक्षण करावे लागते आणि त्या स्वरूपाचे प्रतिरूप असणाऱ्या पृथ्वीवरील अवकाशस्थानकात राहण्याची सवय करून घ्यावी लागते. याच धर्तीवर चीनने जे अवकाशस्थानक उभारले आहे ते आकाराने काहीसे लहान असले तरी त्यात सहा अंतराळवीर राहू शकतात. या सगळ्या पार्श्वभूमीवर भारताचे अवकाशस्थानक कसे असणार याची उत्सुकता सगळ्यांनाच लागलेला आहे. 'इस्रो'ने प्रस्तावित केलेल्या अवकाशस्थानकात एका वेळी चार ते सहा अंतराळवीर सहा महिन्यांपर्यंत राहू शकतील अशी व्यवस्था करण्याचा विचार आहे. पृथ्वीपासून साधारणत: ४०० किलोमीटर अंतरावर हे स्थानक असेल. हे स्थानक कार्यान्वित झाल्यानंतर ते प्रदीर्घकाळ कार्यरत राहणार असून तिथे जैविक प्रयोग, मानवी शरीरावर शून्य गुरुत्वाकर्षणाचे परिणाम, अवकाश संशोधन, ऊर्जा संशोधन, यांत्रिकी क्षेत्रातील संशोधन अशा विविध विषयांवर तिथे काम केले जाणार आहे, असा विश्वास अवकाश संशोधक व्यक्त करीत आहेत.

संपूर्णत: स्वदेशी बनावटीचे असे हे अवकाश संशोधन स्थानक असावे आणि त्याद्वारे अवकाशसंशोधनातील परावलंबित्व कमी करून आपण आत्मनिर्भरतेच्या

दिशेने वाटचाल करावी असे भारताचे ध्येय आहे. ते साध्य झाल्यास अमेरिका आणि अन्य देशांवरील आपले सध्याचे अवलंबित्व तर कमी होईलच परंतु त्याच्या जोडीला भारत अन्य देशांना अवकाश संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या सेवा प्रदान करू शकणारा देश ठरेल आणि ही अवकाश संशोधनाच्या क्षेत्रातील एक मोठीच उपलब्धी ठरणार आहे. विकसनशील देशांनाही त्यातून अवकाश संशोधनाचे प्रोत्साहन आणि पाठबळ मिळेल आणि ते देशसुद्धा अवकाश संशोधनात मोलाचे योगदान देऊ शकतील अशी आशा यातून निर्माण झालेली आहे.

या अवकाश स्थानकासाठी भारताला प्रक्षेपण यानांची क्षमताही मोठ्या प्रमाणावर विकसित करावी लागणार आहे. भारतीय अंतराळ स्थानक हे केवळ वैज्ञानिक प्रयोगांचे केंद्र न राहता भविष्यात व्यापार, संशोधन व अंतराळ पर्यटन अशा अनेक नव्या संधी आगामी काळात निर्माण होणार आहेत. त्यामुळेच आगामी काळात भारताचे अवकाशस्थानक स्थापन करण्याचे पाऊल ठोस, निर्णायक आणि आत्मनिर्भरतेच्या दिशेने जाणारे ठरेल, असा विश्वास भारतातील अवकाश संशोधकांकडून व्यक्त केला जातो आहे तो यामुळेच.

**'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील लेखांचे संदर्भ**


1) https://www.pmindia.gov.in/en/news_updates/bharatiya-antariksh-station-bas-our-own-space-station-for-scientific-research-to-be-established-with-the-launch-of-its-first-module-in-2028/

2) https://www.theguardian.com/world/2025/jun/09/indian-astronaut-shubhanshu-shukla-join-mission-to-international-space-station

3) https://www.nasa.gov/2025-news-releases/

4) https://www.bbc.com/news/articles/ckgl13l3e9xo

५) *संदर्भ : श्रीचक्रधर दर्शन : संपादन समिती : डॉ. वि. भि. कोलते, महंत श्री नागराजबाबा महानुभाव, डॉ. यू. म. पठाण, श्री. पु. चं. नागपुरे, शिक्षण व सेवायोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई – ४०० ३२., १९८२, पृ. क्र. २०२ ते २०१७.*

६) *संदर्भ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, खंड १८, भाग–३ : १९४६ ते १९५६, संपादक : वसंत मून, हरी नरके, प्रा. अशोक गोडघाटे, प्रा. डॉ. म. ल. कासारे, एन. जी. कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र–साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, शासकीय कुटीर क्र. १८, मंत्रालयासमोर, मुंबई – ४०० ०३१. २००२, पृ. क्र. १५६–१७६.*

# उजळणी

१. **लीळाचरित्र : महात्माधर्माचे आचाररूप चित्र**
   – डॉ. व. दि. कुलकर्णी

२. **''राजकीय पक्षांनी स्वत:च्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.''**
   – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# उजळणी-१

## लीळाचरित्र : महात्माधर्माचे आचाररूप चित्र

**– डॉ. व. दि. कुलकर्णी**

'लीळाचरित्र' ही श्रीचक्रधरस्वामींची वाङ्मयमूर्ती होय. सर्वज्ञ जसे होते तसे सर्वेंद्रियांनी शब्दरूपातून अनुभवणे हे लीळाचरित्रा चे उद्दिष्ट आहे. प्रत्यक्षाला शब्दरूप देणे यात या लेखनाची लेखनदृष्ट्या परिसीमा आहे; परिपूर्ती आहे. सर्वज्ञांच्या जीवनातील प्रसंग आणि घटना यांचे यथातथ्य कथन हा या चरित्र – लेखनाचा प्राण असेल, तर स्वामींच्या हृदयधर्माचे यथातथ्य चित्रण हा त्याचा आत्मा होय. 'लीळाचरित्र' हा ग्रंथ एक देशकालातीत, शाश्वत, थोर असा जीवनधर्म वाचकांच्या मनावर ठसवितो. स्वामींच्या नित्य विहरणातून, भक्तमंडळींशी त्यांनी केलेल्या सहजसंवादातून हा धर्म प्रकटत जातो. आचारातूनच विचारांची प्रतीती येते. स्वामी प्रत्यक्ष धर्म जंगले यामुळे स्वामींचा धर्म जाणून घेणे म्हणजे त्यांच्या लीळांचे नित्य स्मरण करणे व या स्मरणातून धर्मरहस्य निरखणे, सदैव जागते ठेवणे होय. 'लीळाचरित्र' वाचताना आपण श्रीचक्रधरांच्या सान्निध्यात त्यांच्या भक्तजनांसमवेत जणू विहार वार्तालाप करीत आहोत; प्रत्यक्ष सर्वज्ञांना पाहतो-ऐकतो आहोत असेच सतत जाणवते. वाचकाला आपल्यात घेऊन पुढे जाणारी व स्वामींच्या अंतरंगात खोल नेऊन सोडणारी ही वाङ्मयकृती आहे.

'लीळाचरित्र' वाचताना श्रीचक्रधरांच्या महानुभावित्वाचा आपल्या मनावर पहिला खोल ठसा उमटतो तो 'ससीकरक्षण' या लीळेतून. दोन पारध्यांच्या तावडीत सापडलेला होडेचा ससा स्वामींच्या जानूतळी लपून बसतो. स्वामी त्याचे पारध्यापासून रक्षण करतात. 'हा ससा कोण आहे? रानात राहणारा तो एक स्वतंत्र जीव आहे; तो रानात राहतो; रानचे खातो-पितो. त्याने कुणाचा कसला अपराध केला आहे? त्याला मारण्याचा कोणासच अधिकार नाही?' असे श्रीचक्रधर पारध्यास सांगतात. प्रत्येक जीवमात्र हा मूलत: स्वतंत्र आणि मुक्त आहे; हेच यातून सूचित होते. पारधी निघून गेल्यावर स्वामी 'सशाला महात्मे हो : आता जाए :' असे म्हणून जानू उचलतात व

त्याला सोडून देतात. जो जो म्हणून जीव आहे तो तो महात्मा आहे. जीवात्मा हा मूलत: महात्मा हे सर्वज्ञांचे अध्यात्मसूत्रच येथे प्रत्यक्ष कृतीतून प्रकटते अर्थात हे सूत्र तत्त्वत: खरे असले तरी व्यवहारात जीवात्म्याला कोणा दुसऱ्या महात्म्याचे किंवा अंतीमत: परमेश्वराचे संरक्षण किंवा आधार असणे आवश्यक असते. या लीळेत सशाला परमेश्वरावतार सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामींचे संरक्षण लाभलेले आहे. 'एथ सरण आलेया काइ मरण असे?' हे स्वामींचे उद्‌गार सर्वशक्तिमान, सर्वज्ञ विश्वपालक परमेश्वराचे उद्‌गार ठरतात. परमेश्वरच जीवात्म्याची म्हणजे त्या जीवाची मूळची तत्त्वरूप योग्यता ओळखू शकतो. या लीळेत केवळ भूतदयावृत्तीचे चित्रण आणि पारध्यांना केलेले अहिंसेचे निरुपण नाही. 'महात्मते'चे सर्वांभूती असणारे अस्तित्व आणि तिचे संरक्षक शक्तिरूप या लीळेत अभिव्यक्त झाले आहे.

महात्मतेचे अस्तित्व स्वामींना सर्वांभूती कसे जाणवते ते 'लीळाचरित्रात' पुन: पुन: पहावयास मिळते. सशासारख्या गोजिऱ्या प्राण्यात महात्मेपण जसे असते तसेच ते वाघासारख्या क्रूर, हिंस्र पशूंत आणि वृश्चिक, इंगळी सर्पादी विषारी प्राण्यांतही ते असते. मठात निघालेल्या विंचवाला फडक्यात धरून मठाबाहेर सोडण्यात येते. सर्वज्ञ एकदा देवळात झोपले असताना दोन साप एकमेकांशी झुंजताना त्यांच्या छातीवर पडले तेव्हा 'एणें हाते हा फेडिला : एणें हाती हा फेडीला :' एवढेच स्वामींनी केले. एकदा तर एक सर्प गोसावीयांचेया दरिसनासि आला : आणि 'वरतीया फडै करूनि गोसावीयाते तेणे नमस्कारिले :' मग 'फुटि वळिली : आणि तैसेचि देह ठेवीले :' टक्कर खेळणाऱ्या रानम्हैशांना श्रीचक्रधरांनी एकमेकांपासून दूर केले. वाघांची क्रूर बुद्धी त्यांनी अनेक वेळा अनेक प्रसंगी नष्ट केली. जणू सर्वज्ञ श्रीचक्रधर क्रूर, विषारी पशूंच्या ठायीच्या महात्मतेला स्पर्श करीत असत. आणि त्यांचे महात्मेपण जागे करीत असत. नरभक्षक पशूंनाही त्याचा वेध लागे आणि ते आपले हिंस्रत्व विसरत. अशा वेळी स्वामीवरच त्यांची काळजी घेण्याचा प्रसंग येई. एकदा चांगदेवीहून सावळदेवाकडे जात असता वाटेत एका वाघाने सर्वज्ञांना पाहिले आणि 'स्तीति जाली'. तो स्वामी समोर आला तेव्हा बाइसा भ्याली 'भिऊ नका' म्हणून सर्वज्ञांनी सांगितले आणि ते चालू लागले. वाघ पाठीमागून येतच होता. अखेर ते एका गावाजवळ आले तेव्हा 'महात्मां आतां राहीजो :' असे सर्वज्ञांनी वाघाला म्हटले. बाइसा लगेच म्हणाली, ''बावा हा कुणाला काही करीत नाही. येईना का बरोबर!'' यावर सर्वज्ञांनी उत्तर दिले, ''बाई : हा आता कोण्हाचें काही न करी : परि लोकू यासि उपद्रो करील कीं :

या लीळेतील सर्वज्ञांचे उद्‍गार अतिशय मार्मिक आहेत. वाघांची हिंस्र वृत्ती येथे नष्ट झाली आहे पण माणूस अजून खरा माणसाळलेला नाही. तो थोडा भयमुक्त होताच दुसऱ्याला छळण्याची त्याची वृत्ती जागी होते, हे स्वामी जाणून आहेत. जीवांचा उद्धार करण्यासाठीच श्रीसर्वज्ञांचा अवतार. त्यांना 'जीवोद्धारव्यसनी अवतार' असेच म्हटले जाते. अधिकारी व्यक्तींना शोधणे, योग्यतेनुसार त्यांना ज्ञान किंवा प्रेम देणे; जे अनधिकारी असतील त्यांचा पापमळ धुवून काढून त्यांना अधिकारी बनविणे हेच या अवताराचे जीवितकार्य होते. 'लीळाचरित्रात' आपणास माणसेच माणसे भेटतात. या गावची, त्या गावची; या पंथातली, त्या पंथातली. कुणी पंडित, कुणी अडाणी, गरीब श्रीमंत, सुखी दुःखी, त्रिविध तापांनी पोळलेली; सर्व जातींची, सर्व वर्णांची! सर्वज्ञ हे समाजप्रिय होते. स्वामींचा हा 'लोकांत' म्हणजे केवळ लोकसंपर्क नव्हता, जीवोद्धरणाची ती लीळा होती. मुकी जनावरे किंवा हिंस्र पशू यांना आपले प्रेम देणारे आणि 'महात्मा' म्हणून त्यांना हाकारणारे सर्वज्ञ, मानवातील गरीब मुक्या जीवांना, तसेच दुष्टबुद्धी विरोधकांनाही आपल्या कृपादृष्टीने सुखी करतात. ते माणसे बरोबर ओळखतात आणि त्यामुळेच मुक्या प्राण्याहूनही त्यांना माणसाची अधिक काळजी वाटते. माणसे लबाड, धूर्त, स्वार्थी, अहंकारी, मत्सरी, दुष्ट, गर्विष्ठ असू शकतात. ती दीन-दुबळी, अगतिक, गांजलेली, स्वतःचा जीव नकोसा झालेलीही असू शकतात. श्रीचक्रधरांना या सर्वांची चिंता असे.

वेरूळला असताना माईबाईसा नावाची एक विधवा बाई स्वामींना भेटावयास आली. तिचा एकुलता एक मुलगा मेला होता. एक मुलगी विधवा झाली होती. दुसरीला वेड लागले होते. दोन्ही मुलींना घेऊन गोमती नदीत जीव द्यायला ती निघाली होती. सारंग पंडितांच्या सांगण्यावरून ती स्वामींकडे आली. स्वामींनी तिला शांत केले. 'शांतिबाईसा' असे तिचे नाव ठेविले, तिच्या मुलीचे वेडही दूर करून तिला सर्व प्रकारे सुखी केले. असा किंत्येकांचा दुःखपरिहार स्वामींनी केला. जानूतळी लपलेल्या सशाला जे अभय लाभले तेच या मानवप्राण्यांनाही लाभले.

**'एथ सरण आलेया काइ मरण असे :'**

हीच त्यांची वृत्ती विनापक्षपात सदैव सर्वत्र आढळते, त्यात आपपरभेद नाही. घोडाचुडीचा शिष्य हातावर भिक्षा मागून तेथेच ती खाऊन टाकी. एकदा एका बाईने गरम आंबील त्याच्या हातावर वाढली. त्याने ती खाऊन हात वळचणीला पुसला आणि झोपडीला आग लागली, सारा गाव पेटला. हे पाहून त्या शिष्यास आनंद झाला. आपले हे योगसामर्थ्य मोठ्या फुशारकीने त्याने सर्वज्ञांस सांगितले तेव्हा ते

म्हणाले, ''महात्मे हो, ओखटे केले : ऐसे ती भूतहिंसा केली : जाली :'' निषेधात्मक बोलानाही सर्वज्ञांनी त्या शिष्यास 'महात्मा' असेच संबोधिले, हे येथे ध्यानी घेण्यासारखे आहे. घोडाचुडीच्या शिष्याने भूतहिंसा केली याचे तर सर्वज्ञांना दु:ख झालेच पण या कृत्याबद्दल त्याला पश्चात्ताप झाला नाही, याचे अधिक दु:ख झाले.

'महात्मा' कसा असावा? तो सर्वांना अभय देणारा असावा. एकदा एके रात्री नाथोवा दूध घेऊन येत होते वाटेतच त्यांना स्थिती झाली. त्यांनी मोठ्याने हाक घातली आणि त्याने सारा गाव गजबजला. 'तुम्ही महात्मे आहात याची स्वामींनी नाथोबाला जाणीव करून दिली. आणि सांगितले की,

**''तुम्ही महात्मे कीं गा : तुम्ही चतुर्विधा भूतग्रामा अभय देयावे की :''**

महात्म्याला भेटण्यास येणारा प्राणी सुखी होऊनच परतला पाहिजे. कारण–

**''प्राणिये एथ आलेया जळता जावे तरी निववावे ते के?''**

असा सर्वज्ञांनीच प्रश्न केला आहे. महात्म्यांनी कोणाचे मन थोडेदेखील दुखविता कामा नये–

**''महात्मेनि प्रियवक्तेया होआवे :''**

स्वामींचा शिष्य पद्मनाभी एकदा वेरूळ येथे परमाणुभवदेव नावाच्या एका प्रतिष्ठित संन्याशाकडे गेला आणि ''आपुला अनुभव काङ परमाणु एवढा असे :?'' अशी त्याने त्यांची चेष्टा केली. हे कळताच श्रीचक्रधरस्वामींनी पद्मनाभिला परमाणुभवदेवाची क्षमा मागावयास लावली सर्वज्ञांनी बळजबरीने कोणास पंथात डांबून ठेवले नाही. आचार्य श्रीनागदेवभट यांनी पंथस्वीकार करण्याचा स्वयं निर्णय घ्यावा यासाठी सर्वज्ञ जाणीवपूर्वक थांबले होते. त्यांनी त्यांच्यावर कोणतेही दडपण आणले नाही. महात्मा हा कोणा शरीराची हिंसा तर करीत नाहीच पण कोणाच्या मनाची हिंसाही त्यास त्याज्य आहे किंबहुना मनाची हिंसा शरीर हिंसेहून सूक्ष्म, अधिक भीषण व पापात्मक आहे असे तो मानतो.

सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामींचा धर्म हा महात्मेया पुरुषाचा धर्म होता. पारंपरिक आध्यात्मिक तत्त्वज्ञान आणि धर्माचार यापेक्षा त्यांच्या धर्मात स्वयंस्फूर्तताच अधिक होती. शब्दप्रामाण्यापेक्षा त्यात स्वत: प्रामाण्यच होते; आणि स्वत:प्रामाण्य असूनही त्यात अहंकार, दर्प, परनिंदा यांचा लवलेशही नव्हता. 'स्वत:प्रामाण्य' या शब्दातील स्वत: या पदाचा अर्थ, त्याची अर्थव्याप्ती पाहणे येथे आवश्यक आहे.

'एथ' हे पद 'लीळाचरित्रा'मध्ये वारंवार येते. 'एथ अनुसरा : एथ अनुसरलीयाचिया दोनच घडिया पूरेति :'; 'एथौनि म्हणीतले ते कीजे : याते अनुसरण बोलीजे :', 'एथ

जातिकुल नाही : खुंटदावे नाही :' अशी वचने 'लीळाचरित्रा'त येतात. येथे एथ म्हणजे हा, हा माणूस (= अयं जन:) म्हणजेच 'मी', 'मी स्वत:' असा अर्थ होतो. श्रीचक्रधरस्वामी स्वत:च बोलत असल्याने 'एथ' म्हणजे 'मी' म्हणजे 'सर्वज्ञ श्रीचक्रधर' असा येथे सरलार्थ होतो पण श्रीचक्रधरस्वामी हे स्वत: परात्पर परब्रह्म परमेश्वरावतार असल्याने येथे 'एथ' म्हणजे 'परमेश्वर' असे तत्त्वत: परमार्थाने निर्दिष्ट होते.

'एथौनि म्हणीतले ते कीजे:', 'एथ सरण आलेया काइ मरण असे :', ह्या श्रीचक्रधरोक्ती वाचताना श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील भगवान श्रीकृष्णाच्या 'मां अनुस्मर', 'न मे भक्त: प्रणश्यति', या वचनांची आठवण होते. 'मन्मना' भव मद्‌भक्तो मद्‌याजी मां नमस्कुरु ।' हे वचनही स्मरते. श्रीचक्रधर हे ही श्रीकृष्णावतार आहेत आणि ते भक्तांना असेच अभय देत आहेत, हे ध्यानी येते. 'एथ' म्हणजे आपण स्वत: श्रीचक्रधर प्रत्यक्ष परमेश्वरच येथे भक्तांना अभय देत आहे हे समजते. श्रीचक्रधरांचे बोलणे हे प्रत्यक्ष परमेश्वरावताराचे बोलणे असल्याने येथे स्वप्रामाण्य, म्हणूनच स्वत: प्रामाण्य असू शकते. श्रीचक्रधरस्वामी बोलतात ते स्वत:हून अगदी अनुभवप्रमाण आणि नि:शंक! आपण श्रीकृष्णाचे अवतार आहोत आणि जीवोद्धारणासाठी येथे अवतरलो आहोत हे श्रीचक्रधरांनी आपल्या अनेक लीळांतून प्रगट केले आहे, आणि याचा प्रत्यय त्यांच्या भक्तजनांना आल्याचे बऱ्याच लीळांतून व्यक्त झाले आहे. 'द्विज गोरक्षण' (एकांक लीळा – क्रमांक ४०) या लीळेत वृंदावनीच्या गोपालकृष्णांच्या रूपातच श्रीचक्रधरस्वामी अवतरले आहेत. 'आमचेया गाइ राखे तो साक्षात. श्रीकृष्णु :' असे गायीच्या मालकाचे उद्‌गार आहेत. गोपाळांच्या बरोबर श्रीचक्रधर रानफेरीचा खेळ खेळतात, त्यांच्यात बसून काला खातात. (एकांक. ली. क्र. ३३) त्यांच्याबरोबर दुकानदारीचा लुटपुटीचा खेळ खेळतात; गोपाळांत गोपाळ बनून जातात (एकांक क्र. ५८). एका गोकुळ अष्टमीला तर ते स्वत:च श्रीकृष्ण होतात. व देवकीएचा उसंगी रिगतात (एकांक क्र. ६७) 'उपाधीयांचेया खांदावरि श्रीकरू घालूनि' गंगेच्या तीरावरून जात असता स्वामींची सावली गंगेच्या पाण्यात पडते तेव्हा जळचरे वर उसळून येतात. स्वामी उपाध्यायांना सांगतात की, 'श्रीकृष्णावतारी यमुनेच्या तीरावर पाताळगत जलचरे श्रीमूर्ति अवलोकण्यास अशीच वर येत असत'. श्रीचक्रधरांनी आपला कृष्णावतार येथे सूचित केला आहे. (पूर्वार्ध, भा. २, ली. २९०) 'द्वारावतिकार तेचि आमचे गोसावी' असा महदाइसाला प्रत्यय आल्याची कथा 'एकांक' आणि 'पूर्वार्ध' दोनही ठिकाणी येते. आऊसेच्या प्रथम भेटीतच श्रीचक्रधरांनी तिला आपल्या जवळच्या देवाची व कृष्णाची धातूची मूर्ती

टाकून देण्यास सांगितले. तेव्हा ‘कृष्णेया नको सांडु : हा मज वाट दाखवी :’ असे आऊसेने म्हणताच सर्वज्ञांनी ‘आता साक्षात श्रीकृष्णच तुम्हास वाट सांगेल’ असे सांगितले. ‘जेचि श्रीकृष्ण चक्रवर्ती तेचि आमचे गोसावी :’ अशी भक्तजनांची खाती झाली होती. हरिदेव पंडिताशी गोपाळमंतासंबंधी बोलताना सर्वज्ञ म्हणाले, ‘‘गोपाळमंत्री शतसहस्र संख्या भेद : ते भेद के आति : एकू भेद तो कहणीचि नेणे : रुक्मिणीदेवीप्रति श्रीकृष्ण चक्रवर्ति निरोपिला : म्हणौनि रुक्मिणीदेवी जाणे : का श्रीकृष्ण चक्रवत जाणति : आणिक कव्हाणीचि नेणति :’’ हा मंत्र सर्वज्ञांना ज्ञात होता. तेव्हा ‘‘उपाधियासि प्रतीति बैसली : द्वापारीचे ते हे गोसावी :’’ असे प्रसंगाप्रसंगाने मधूनमधून श्रीचक्रधर हे द्वापारयुगातील मूळ श्रीकृष्णावतारातील स्वानुभूतीत स्मृतिरूपाने किंचित काळ रमत– हरपत. ह्या लीळा श्रीमद्भागवतातील श्रीकृष्णाच्या वृंदावनीच्या, द्वारावतीच्या, श्रीकृष्णाच्या लीळा आहेत. श्रीमद्‌भगवद्‌गीता सांगणारा महाभारतातल्या भीष्मपर्वातला श्रीकृष्ण लीळाचरित्रात विरळानेच आढळतो.

स्वत: श्रीकृष्ण अवतार असूनही श्रीचक्रधरांनी भगवान श्रीकृष्णाची गीता धर्मनिरूपणासाठी घेतलेली नाही. कोणताही अध्यात्मग्रंथ त्यांनी, लिहिला नाही. प्रयाणकाळाची वेळ जसजशी जवळ येत गेली तसतशी धर्मनिरूपणाची त्यांची प्रवृत्ती अनावर होत गेली; हे खरे. पण त्यांनी आपली वचने काळाक्षरी प्रतिपन्न केली नाहीत. त्यांनी आचारातूनच धर्मरहस्य व्यक्त केले. परमेश्वर मूर्तीत नाही; तो आगाधाचा आगाध आहे. त्याचे खरे स्वरूप अगम्य, अतर्क्य आहे. हे त्यांनी प्रसंगपरत्वे स्पष्ट केले आहे. एका जन्माष्टमीच्या दिवशी बोणेबाई मातीचे गोकुळ करीत. ते पाहून श्रीकृष्ण काइ मातीएचा : देवकीदेवी काइ मातीएची : असे सर्वज्ञांनी तिला छेडले होते. आबाइसाने भटोबासाकडून अनंत चतुर्दशीला सुताचा अनंत करून घेतला होता. तेव्हा सर्वज्ञ म्हणाले, ‘‘अनंत तो काइ सुताचा : बाई : अनंत तो काइ एवढा : अनंत तो अनंत की :’’ श्रीचक्रधरस्वामींना गोकुळअष्टमीचा उपवासही मान्य नव्हता. ‘‘बाइ : श्रीकृष्ण उपजले : ते देवकीया देवी काइ उपवासू केला : हा आणखी एक प्रश्न त्यांनी बोणेबाईलाही केला होता. श्रीचक्रधरांच्या धर्मरूपावर विचार – आचारदृष्ट्या येथे स्वच्छ प्रकाश पडतो. तिकंवनायकाला स्वामींच्या ईश्वरत्वासंबंधी शंका असते, तेव्हा महदाइसेला स्वामी सांगतात की, ‘‘बाइ : हे काइ ब्राह्मण, की क्षेत्री : की वैश्य : की शूद्र: हे नेणिजे की :’’ परमेश्वर ही इहलोकीच्या साऱ्या भेदापलीकडील निर्मळ वस्तू आहे; हे येथे स्पष्ट होते. श्रीचक्रधरांच्या ठाइ परपंथ, परपंथीय देवता, परपंथीय आचार्य यांच्यासंबंधी द्वेष

किंवा मत्सर नाही. परमाणुभवदेवांचा अपमान करणाऱ्या पद्मनाभीला स्वामी त्यांची क्षमा मागवल्याशिवाय आपल्यात प्रवेश देत नाहीत. जसे अन्य आचार्याबद्दल तसेच अन्य देवाबद्दल ''वैरीयाचा देवो जाला तरी काइ दगड घालोनि फोडावा'' असेही दोन शिष्यांना खडसावण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही.

स्वामी स्वत: श्रीकृष्णावतार असले तरी राखसे रामदेवाला त्यांनी आपले दर्शन महादेवरूपात घडविले. 'एक महादेवाला किंवा महादेव दाखविणाऱ्याला आम्ही नमस्कार करतो; इतर कोणासही नाही' असे राखसे रामदेवाने म्हणताच 'कर्पूर गौरु : व्रषभ वाहान : अर्धांगी पार्वती : पंचवगत्र : त्रीनेतू : खड्‌वांग कपाळ : पींगटा जटै : वाघांबर प्रावर्ण : वीशूळ डौर : ऐसा महादेवो दर्शविला :'

महानुभाव पंथाला 'महात्मा पंथ' असेही म्हटले जाते, आणि या पंथातील अधिकारी व्यक्ती यांना 'महात्मा' असे संबोधतात. खरे तर सर्व जीवात्मे तत्त्वत: महात्मेच होत. 'लीळाचरित्र' हा ग्रंथ महात्म्यांचा जीवनधर्म दृष्टिगोचर करणारा अपूर्व ग्रंथ आहे. प्रत्यक्ष आचारातून येथे धर्मतत्त्व प्रकटते. किती गावी, किती वेळा श्रीचक्रधरांनी अटन केले आणि किती भक्तजनांनी त्यांचे दर्शनसुख अनुभविले! प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक क्षणी, श्रीचक्रधरांच्या महात्माधर्माचे स्वच्छ सुंदर दर्शन घडते.

महात्मा ही पंथीय पारिभाषिक संज्ञा असली तरी ती मूलत: गुणवाचक, धर्मदर्शक संज्ञा आहे. सृष्टीत जे महात्मेपण पाहणे, अनुभवणे आणि जोपासणे हेच या महानुभाव पंथाचे उद्दिष्ट आणि कार्य आहे. गुंफा करण्यासाठी केलेली चिखलाची गारी मुंग्यांनी भरलेली पाहताच स्वामींनी दुसरी गारी करविली, ''एथीची सेवा ते भूतां अविरोध करावी कीं गा :'' ही त्या मागील धर्मबुद्धी. आपल्यावर हल्ला करणाऱ्या सैनिकांशी लढणाऱ्या नागदेवांना स्वामींनी परावृत्त केले. ''तुम्हा मारिता पुजिता समानचि होआवा कीं गा :'' हे महात्म्याचे थोर हृदय यामागे होते. महात्मा पंथाचे प्रवर्तक ह्या पंथाहूनही असे थोर होते. मुंगीसारखा मुका जीव असो, की घाव घालणारा आततायी असो, हे महानुभावित्व अचल, शांत असते. हे महानुभावित्व असणारा पंथ तो महानुभाव पंथ, महात्मा पंथ. अशा महात्म्यांचा धर्म तो महात्मा – धर्म. 'लीळाचरित्र' हे महात्मा धर्माचे आचाररूप जिवंत चित्र होय.

*(**संदर्भ :** श्रीचक्रधर दर्शन : संपादन समिती : डॉ. वि. भि. कोलते, महंत श्री नागराजबाबा महानुभाव, डॉ. यू. म. पठाण, श्री. पु. चं. नागपुरे, शिक्षण व सेवायोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई – ४०० ३२., १९८२, पृ. क्र. २०२ ते २०१७.)*

# उजळणी-२

## ‘‘राजकीय पक्षांनी स्वत:च्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.’’

**– डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

संविधान कितीही चांगले असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहाणार नाही. तसेच संविधान कितीही वाईट असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहाणार नाही. संविधानाचा अंमल हा संपूर्णत: संविधानाच्या स्वरुपावर अवलंबून नसतो. संविधान हे केवळ राज्याचे काही विभाग जसे कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका निर्माण करुन देते. राज्याच्या या विभागांचे कार्य लोक आणि लोकांनी स्वत:च्या आकांक्षा आणि राजकारणासाठी साधन म्हणून निर्माण केलेले राजकीय पक्ष यावर अवलंबून राहाणार आहे. भारतातील लोक आणि त्यांचे राजकीय पक्ष कसे वागतील हे कोण सांगू शकेल? आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी ते अवलंब करतील की क्रांतिकारी मार्गांचा अवलंब करतील? मार्गांचा अवलंब केल्यास संविधान कितीही चांगले असो, ते अयशस्वी होईल हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्त्याची गरज नाही. आणि म्हणून भारतीय संवैधानिक मार्गांचा त्यांनी क्रांतीकारी लोक आणि त्यांचे राजकीय पक्ष कसे वागतील हे जाणून घेतल्याशिवाय संविधानाबाबत कोणताही निर्णय घेणे निरर्थक ठरेल.

*(**टीप :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत तारीख २५ नोव्हेंबर १९४९ या दिवशी केलेल्या भाषणाचा संपादित अंश. दुसऱ्या दिवशी म्हणजे, २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेन्द्र प्रसाद यांचे समारोपाचे भाषण होऊन त्या दिवशी भारताचे संविधान संमत झाले).*

माझे मन देशाच्या भवितव्याबाबत इतके चिंताग्रस्त आहे की, त्यासंबंधातील माझी मते व्यक्त करण्यासाठी या प्रसंगाचा मी उपयोग करावा, असे मला वाटते. २६ जानेवारी १९५० ला भारत एक स्वतंत्र राष्ट्र होईल. त्याच्या स्वातंत्र्याचे काय होईल? तो आपले स्वातंत्र्य अबाधित ठेविल की पुन्हा गमावून बसेल? हा विचार माझ्या मनात प्रथम उभा राहतो. असे नाही की भारत हा यापूर्वी कधीही स्वतंत्र नव्हता. मुद्दा हा आहे की त्याने असलेले स्वातंत्र्य एकदा गमावले आहे. तो पुन्हा दुसऱ्यांदा ते गमाविल का? भवितव्याबाबतचा हाच विचार मला सर्वाधिक चिंताग्रस्त करतो. भूतकाळात भारताने केवळ आपले स्वातंत्र्य गमावले असे नव्हे तर ते देशातील काही लोकांच्या बेईमानी आणि विश्वासघातामुळे गमावले गेले ही वास्तविकता मला अधिक अस्वस्थ करते. महम्मद बीन कासीमने सिंध प्रांतावर आक्रमण केले त्यावेळी दहार राजाच्या सैनिक अधिकाऱ्यांनी महम्मद बीन कासीमच्या हस्तकांकडून लाचा स्वीकारल्या आणि आपल्या राजाच्या बाजुने लढण्याचे नाकारले. महम्मद घोरीला भारतावर आक्रमण करण्याचे निमंत्रण देणारा जयचंद होता. आणि त्याने त्याला पृथ्वीराज विरुद्ध लढण्यासाठी स्वत:च्या आणि सोळंकी राजांच्या मदतीचे आश्वासन दिले. जेव्हा शिवाजी हिंदुच्या मुक्तीसाठी लढत होता त्यावेळी इतर मराठा सरदार आणि रजपूत राजे मोगल सम्राटांच्या बाजुने युद्ध लढत होते. जेव्हा शीख राज्यकर्त्यांचा नि:पात करण्याचा प्रयत्न इंग्रज करीत होते तेव्हा त्यांचा प्रमुख सेनापती गुलाबसिंग शांत बसला आणि शिखांचे राज्य वाचविण्यासाठी त्याने शिखांना मदत केली नाही. १८५७ ला भारतातील बहुतांश भागांनी इंग्रजांच्या विरुद्ध स्वातंत्र्ययुद्धाची घोषणा केली, तेव्हा शीख बघ्याच्या भूमिकेतून त्या घटनेकडे पाहात राहिले.

इतिहासाची पुनरावृत्ती होईल काय? याच विचाराने मी चिंताग्रस्त झालो आहे. जातींच्या आणि संप्रदायांच्या स्वरूपातील आपल्या जुन्या शत्रूंसोबतच भिन्न आणि परस्परविरोधी विचारप्रणाली असणाऱ्या बऱ्याच राजकीय पक्षांचीही भर पडणार आहे. या वास्तवाच्या जाणीवेने मी अधिकच चिंतातूर झालो आहे. भारतीय लोक आपल्या तत्त्वप्रणालीपेक्षा देशाला मोठे मानतील की देशापेक्षा तत्त्वप्रणालीला मोठे मानतील? मला माहित नाही. परंतु एवढे मात्र निश्चित की जर पक्षांनी स्वत:च्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर आपले स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात आल्याशिवाय राहाणार नाही. आणि कदाचित कायमचे घालविले जाईल. या संभाव्यतेविरुद्ध लढण्यासाठी आपण कटिबद्ध व्हायला हवे. आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपण निर्धार केलाच पाहिजे.

२६ जानेवारी १९५० ला भारत एक लोकसत्ताक देश होईल तो या अर्थाने की, भारतात त्या दिवसापासून लोकांचे, लोकांनी बनविलेले आणि लोकांसाठी असलेले सरकार प्राप्त होईल. तोच विचार माझ्या मनात येतो, ह्या लोकसत्ताक संविधानाचे काय होणार? हा देश ते अबाधित ठेवण्यासाठी समर्थ राहील की पुन्हा तो ते गमावून बसेल. माझ्या मनात येणारा हा दुसरा विचार आहे आणि पहिल्याप्रमाणेच तो मला चिंतातूर करणारा आहे.

भारताला लोकशाही म्हणजे काय हे माहीत नव्हते असे नाही. एक काळ असा होता की, भारत हा गणराज्यांनी भरगच्च होता आणि जिथे कुठे राजेशाही असेलच तर ती एकतर निवडलेली किंवा सीमित असायची. त्या प्रणाली कधीही अनिर्बंध नव्हत्या. भारताला संसद किंवा संसदीय प्रणाली माहीत नव्हती असे नाही. बौद्ध भिक्खू संघाच्या अभ्यासातून हे स्पष्ट होते की, त्यावेळी केवळ संसदच होती असे नव्हे --संघ हे दुसरे काही नसून संसदच होते- तर आधुनिक काळाला परिचित असलेल्या सांसदीय कार्यप्रणालीचे सर्व नियम संघाला माहीत होते आणि त्यांचे ते पालन करीत होते. बसण्याच्या व्यवस्था, विधेयक मांडण्याचे नियम, ठराव, कामकाजासाठी आवश्यक असलेली किमान संख्या, पक्ष प्रतोदाने आदेश काढणे, मतमोजणी, मतपत्रिकेद्वारे मतदान करणे, कपात सूचना, नियमितता, न्यायव्यवस्था इत्यादिबाबत त्यांच्याजवळ नियम होते. संसदेच्या कामकाजाचे हे नियम बुद्धाने संघाच्या सभेसाठी उपयोगात आणले असले, तरी देशात त्याकाळी कार्यरत असलेल्या राजकीय विधीमंडळांच्या नियमावलीतूनच त्यांनी ते स्वीकारले असले पाहिजेत.

ही लोकसत्ताक पद्धती भारताने गमावली. पुन्हा दुसऱ्यांदा तो ती गमावणार काय? मला माहित नाही, परंतु भारतासारख्या देशात हे सहज शक्य आहे की, - लोकशाही प्रदीर्घकाळपर्यंत उपयोगात नसल्यामुळे ती अगदीच नवीन भासण्याची शक्यता आहे जिथे लोकशाहीने हुकूमशाहीला स्थान देण्याचा धोका आहे. हे सहजशक्य आहे की, नव्यानेच जन्माला आलेली लोकशाही आपले बाह्य स्वरुप सांभाळेल परंतु प्रत्यक्षात ती हुकूमशाहीला स्थान देईल. जर प्रचंड बहुमत असले तर दुसरी शक्यता वास्तवात येण्याचा मोठा धोका आहे.

केवळ बाह्य स्वरुपात नव्हे, तर प्रत्यक्षात लोकशाही अस्तित्वात यावी अशी जर आपली इच्छा असेल तर त्यासाठी आपण काय करायला हवे? माझ्या मते पहिली गोष्ट जी केलीच पाहिजे ती अशी की, आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण संवैधानिक मार्गांचीच कास धरली पाहिजे. याचा अर्थ हा की,

क्रांतीचा रक्तरंजित मार्ग आपण पूर्णत: दूर सारला पाहिजे. याचा अर्थ कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह या मार्गांना आपण दूर ठेवले पाहिजे. आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टपुर्तीसाठी संवैधानिक मार्गासारखा कोणताही मार्ग शिल्लक नव्हता त्यावेळी असंवैधानिक मार्गांचा अवलंब करण्याचे समर्थन मोठ्या प्रमाणात केले जात होते. परंतु जेव्हा संवैधानिक मार्ग उपलब्ध आहेत तेव्हा या असंवैधानिक मार्गांचे समर्थन होऊ शकत नाही. हे मार्ग इतर काही नसून अराजकतेचे व्याकरण आहे आणि जितक्या लवकर आपण त्यांना दूर सारू तेवढे ते आपल्या हिताचे होईल.

दुसरी महत्त्वाची गोष्ट, जिचे पालन केले पाहिजे ती अशी की, लोकशाहीच्या संवर्धनात आस्था असणाऱ्या सर्वांना जॉन स्टुअर्ट मिल यांनी दिलेला सावधगिरीचा इशारा लक्षात ठेवावा लागेल. त्यांच्या मते, ''लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये. तसेच त्याच्यावर इतका विश्वास ठेवू नये की जेणे करुन त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उध्वस्त करण्यासाठी उपयोग करील.'' संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी व्यतित केलेल्या महापुरूषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही. परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालाही मर्यादा असल्या पाहिजेत. आयरीश देशभक्त डॅनियल ओकॉनेल यांनी समर्पकपणे म्हटल्याप्रमाणे, ''कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही, कोणतीही स्त्री स्वत:च्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही आणि कोणताही देश स्वत:च्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही.'' इतर देशांच्या तुलनेत भारताला हा सावधगिरीचा इशारा लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे, कारण भारतात भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर कोणत्याही देशाच्या राजकारणात दिसणार नाही इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तीपूजा ही अध:पतन आणि अंतिमत: हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो.

तिसरी गोष्ट आपण केली पाहिजे ती अशी की, केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण एका सामाजिक लोकशाहीत सुद्धा परिवर्तन करायलाच हवे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तो एक जीवन मार्ग आहे, जो स्वातंत्र्य,

समता आणि बंधुता यांना जीवनतत्त्वे म्हणून मान्यता देतो. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ह्या तत्त्वांचा एका त्रयीची स्वतंत्र अंगे म्हणून विचार करता येणार नाही. ते त्रयीचा एक संघ निर्माण करतात, ते या अर्थाने की, त्यापैकी एकाची दुसऱ्यापासून फारकत करणे म्हणजे लोकशाहीचा मूळ उद्देशच पराभूत करणे होय. समतेपासून स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही, समता स्वातंत्र्यापासून वेगळी करता येत नाही. तसेच स्वातंत्र्य आणि समता ही बंधुभावापासून वेगळी करता येत नाहीत. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे काही लोकांचे बहुतांश लोकांवर प्रभुत्व निर्माण करणे होय; स्वातंत्र्याशिवाय समता ही वैयक्तिक कर्तृत्वाला मारक ठरेल. बंधुत्वाशिवाय स्वातंत्र्य व समता स्वाभाविकरित्या अस्तित्वात राहाणार नाहीत, त्यांच्या अंमलबजावणीसाठी पोलीस यंत्रणेची गरज भासेल. भारतीय समाजात दोन बाबींचा पूर्णत: अभाव आहे ही वस्तुस्थिती मान्य करूनच आपण सुरुवात केली पाहिजे. त्यापैकी एक समता आहे. सामाजिक क्षेत्रात आपला भारतीय समाज हा श्रेणीबद्ध विषमतेच्या तत्त्वावर आधारित आहे. याचा अर्थ काही लोक वरच्या स्तरावर असतात तर बाकीचे निकृष्ट अवस्थेत असतात. आर्थिक क्षेत्रात आपल्या समाजात काहींजवळ गडगंज संपत्ती आहे, तर अनेक लोक घृणास्पद दारिद्र्यात जगतात. २६ जानेवारी १९५० ला आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत, राजकारणात आपल्याकडे समता राहील परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र, सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे, प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारित राहाणार आहोत. अशा परस्पर विरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहाणार आहोत? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आणखी किती काळ समता नाकारणार आहोत? आपण जर ती अधिक काळपर्यंत नाकारत राहिलो, तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहाणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत ते या सभेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाहीची संरचना उध्वस्त करतील.

आपल्यात उणीव असलेली दुसरी बाब म्हणजे बंधुत्वाचे तत्त्व मान्य करणे ही होय. बंधुत्व म्हणजे काय? जर भारतीय लोक एक असतील तर सर्व भारतीयांमध्ये बंधुत्वाची समान भावना असणे हे होय. हे तत्त्व सामाजिक जीवनाला एकता आणि

एकजिनसीपणा प्राप्त करुन देते. ही बाब प्राप्त करणे कठीण आहे, ती किती कठीण आहे, हे संयुक्त राष्ट्र अमेरिकेविषयी जेम्स ब्राईसने त्याच्या अमेरिकन कॉमनवेल्थ या खंडात सांगितलेल्या गोष्टीवरुन कळून येईल. ब्राईसच्याच शब्दात मी उद्धृत करु इच्छितो, ती घटना अशी–

''काही वर्षापूर्वी अमेरिकन प्रोटेस्टंट एपिस्कोपल चर्चच्या त्रैवार्षिक अधिवेशनात त्यांच्या सामुदायिक प्रार्थनेत फेरबदल करण्याचा प्रसंग आला. प्रार्थना लहान वाक्यांची करुन त्यात सर्व लोकांसाठी असलेल्या प्रार्थनेचा समावेश करणे योग्य होईल असा विचार करण्यात आला आणि न्यु इंग्लंडच्या प्रमुख धर्मोपदेशकाने पुढील शब्द सुचविले, हे प्रभो, आमच्या राष्ट्राला आशिर्वाद दे. उत्स्फुर्तपणे ते त्या दिवशी मान्य करण्यात आले. या वाक्यावर दुसऱ्या दिवशी पुन्हा विचार करण्यात आला. धर्मोपदेशकांव्यतिरिक्त इतर अनेकांनी राष्ट्र या शब्दावर आक्षेप घेतले. त्यांच्या मते या शब्दामुळे संपूर्ण राष्ट्राचे ऐक्य प्रत्यक्षात नसले तरी स्पष्टपणे सूचित होते. त्यामुळे, तो शब्द गाळण्यात आला आणि हे प्रभो, या संयुक्त राज्यांना आशिर्वाद दे या शब्दांचा स्वीकार करण्यात आला.

ही घटना घडली त्यावेळी अमेरिकेतील लोकांमध्ये एकत्त्वाची भावना इतकी कमी होती की, आपण एक राष्ट्र आहोत असे अमेरिकेच्या लोकांना वाटत नव्हते. जर अमेरिकेच्या लोकांमध्ये आपण राष्ट्र आहोत ही भावना निर्माण होऊ शकली नाही तर भारतीयांनी आपण एक राष्ट्र आहोत हे समजणे किती कठीण आहे हे कळून येईल. मला ते दिवस आठवतात जेव्हा राजकारणाने प्रेरित लोकांना भारतीय लोक या शब्दाची चीड येत असे. भारतीय राष्ट्र म्हणणे ते पसंत करीत असत. मी या मताचा आहे की. आपण एक राष्ट्र आहोत यावर विश्वास ठेवणे म्हणजे जे अस्तित्वात नाही ते अस्तित्वात आहे असा समज बाळगण्यासारखे होईल. हजारो जातींमध्ये विभागलेल्या लोकांचे राष्ट्र कसे बनू शकेल? सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या अजूनही आम्ही एक राष्ट्र नाही याची आम्हाला जेवढ्या लवकर जाणीव होईल तेवढे ते आमच्या हिताचे ठरेल. त्यानंतरच एक राष्ट्र होण्याच्या गरजेचे महत्त्व आम्हाला कळेल आणि आमच्या उद्दिष्टपूर्तीसाठी कोणत्या मार्गांचा आणि उपायांचा अवलंब करावा याचा आम्ही गांभीर्याने विचार करू शकू. या ध्येयाप्रत पोहोचणे अतिशय कठीण आहे, अमेरिकेतील लोकांना जेवढे कठीण होते त्याहीपेक्षा कितीतरी पटीने कठीण आहे. अमेरिकेत जातीची समस्या नाही. भारतात जाती आहेत. जाती या राष्ट्रविरोधी आहेत. पहिली गोष्ट, त्या समाजजीवनात

विभागणी करतात. त्या राष्ट्रविरोधी आहेत कारण त्या जाती-जातींमध्ये मत्सर व तिरस्काराची भावना निर्माण करतात. आम्हाला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल तर या सर्व अडथळ्यांवर आम्ही मात केलीच पाहिजे. राष्ट्र निर्मिती नंतरच बंधुत्व वास्तवात पाहावयास मिळेल. बंधुत्वाशिवाय असलेली समता आणि स्वातंत्र्य म्हणजे रंगाच्या वरवरच्या थरांसारखा केवळ बाह्य देखावा असेल.

आपल्यासमोर असलेल्या अवघड, जिकिरीच्या कामाबद्दल माझ्या या प्रतिक्रिया आहेत. काहींना त्या कदाचित फार आनंददायी वाटणार नाहीत. या देशात राजकीय सत्ता ही मुठभर लोकांची मक्तेदारी राहिली आहे आणि बहुतांश लोक केवळ ओझे वाहणारे प्राणीच नव्हे तर भक्ष्यस्थानी असलेले प्राणी झाले आहेत. हे कोणालाही नाकारता येणार नाही. या मक्तेदारीने त्यांना केवळ विकासाच्या संधीपासूनच वंचित ठेवले असे नव्हे तर मानवी जीवनाचे महत्त्वही कळणार नाही इतका त्यांचा नि:पात केला आहे. हे पददलित वर्ग त्यांच्यावर होत असलेल्या हुकूमतीला कंटाळले आहेत. स्वत:च राज्य करण्यासाठी ते आतूर झाले आहेत. पददलित समाजातील लोकांमध्ये निर्माण झालेल्या या तीव्र आकांक्षा वर्गसंघर्ष आणि वर्गयुद्ध होण्याइतपत वाढू देता कामा नये. त्याचा परिणाम घर दुभंगण्यात होईल. तो निश्चितपणे विनाशकारी दिवस असेल. अब्राहम लिंकन यांनी समर्पकरित्या म्हटल्याप्रमाणे, दुभंगलेले घर अधिक काळपर्यंत टिकू शकत नाही. त्यांच्या आकांक्षांच्या पूर्तीसाठी जेवढ्या लवकर त्यांना संधी उपलब्ध करुन देता येईल तेवढे ते मूठभरांच्या हिताचे, देशाच्या हिताचे, त्याच्या स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ आणि त्याच्या लोकसत्ताक संरचना टिकून राहाण्यासाठी अधिक उपयुक्त ठरणार आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात समता आणि बंधुत्व प्रस्थापित करण्यानेच हे शक्य होणार आहे. त्यामुळेच त्यांच्यावर मी इतका भर दिला आहे.

मी सभागृहाला अधिक थकवू इच्छित नाही. स्वातंत्र्य ही आनंदाची बाब आहे याबद्दल शंका नाही. परंतु या स्वातंत्र्याने आपल्यावर फार मोठ्या जबाबदाऱ्या टाकलेल्या आहेत याचा आपण विसर पडू देता कामा नये. या स्वातंत्र्यामुळे, कोणत्याही वाईट गोष्टीसाठी आपल्याला आता इंग्रजांवर दोषारोपण करता येणार नाही. यापुढे जर काही वाईट घडले तर त्यासाठी आपल्याशिवाय इतर कुणालाही दोषी धरता येणार नाही. अनुचित घटना घडण्याचा मोठा धोका आहे. काळ वेगाने बदलतो आहे. आपले लोक सुद्धा, नवनवीन विचारप्रणालींचा मागोवा घेत आहेत. लोकांच्या राज्याचा आता त्यांना कंटाळा येवू लागला आहे. आता त्यांना लोकांसाठी

राज्य हवे आहे. आणि राज्य लोकांचे व लोकांनी निवडलेले आहे किंवा नाही याची चिंता ते करणार नाहीत. ज्या संविधानात आपण लोकांचे, लोकांकरिता निवडलेले शासन या तत्त्वाचे जतन केले आहे ते जर आपल्याला सुरक्षित ठेवायचे असेल, तर आपल्या मार्गात कोणते अडथळे येणार आहेत ते आपण ओळखले पाहिजेत की जेणेकरुन लोकांनी निवडून दिलेल्या सरकारच्या तुलनेत लोकांसाठी असलेल्या सरकारला लोक प्राधान्य देण्याकडे वळतील, यासाठी पुढाकार घेण्यात आपण दुर्बल ठरता कामा नये. देशाची सेवा करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. दुसरा अधिक चांगला मार्ग मला माहीत नाही.

*(**संदर्भ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, खंड १८, भाग-३ : १९४६ ते १९५६, संपादक : वसंत मून, हरी नरके, प्रा. अशोक गोडघाटे, प्रा. डॉ. म. ल. कासारे, एन. जी. कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, शासकीय कुटीर क्र. १८, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३१. २००२, पृ. क्र. १५६-१७६.)*

*(**टीप :** शुद्धलेखन मूळ लेखाबरहुकूम)*

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

## OTHER PUBLICATIONS

*Marathi Monthly:*

*ARTHABODH-PATRIKĀ*,
(Subscription Rs. 100/- per year)

*Books and Booklets:*

1. *Bhāratāteel Lok-Sankhyā Wādhichā Prashna: Santati-Niyamanāchee Jaruree Wa Tyāteel Yash,*
(The Problem of Population Growth in India: The Need for Family Planning and its Success) (in Marathi)
by Kumudini Dandekar, Pp. 60, Rs. 30/-.

2. *Compulsory Primary Education - Opportunities and Challenges,* Second Edition,
(in English and Marathi),
by Jayakumar Anagol, Pp. 54 and 61, Rs. 30/-.

3. *Shodh Ghetay Tay Shikshan,*
(To Searches is Education), (in Marathi),
by Ramesh Panse, Pp. 67, Rs. 50/-.

4. *Kartā-Karvitā, Adhunik Mendu-Sanshodhan va Aple Jeevan,*
by Ramesh Panse, Rajyashree Kshirsagar, Anita Belhekar-Deshmukh,
Pp. 242, Rs. 350/-.

5. *Governance, Supervision and Market Discipline: Lessons from Enron*
by Jayanth R. Varma, Pp. 87, Rs. 100/-.
Reprint from (*Journal of Indian School of Political Economy,*
Vol. XIV, No. 4, October-December 2002)

6. *Poverty in India,* (Reprint 2008), by V.M. Dandekar and N. Rath,
Reprinted by Books for Change Bangalore, Pp. vi+140, Price Rs 200/-

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**
- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**

# वाचनीय पुस्तके

■ **THE GREAT CONCILIATOR**
**Lal Bahadur Shastri and the Transformation of India,**
**Author - Sanjeev Chopra,**
**Bloomsbury, India, New Delhi, 2025,**
**Pp. XIII + 369, Price - Rs. 899/-.**

स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या पंतप्रधानकीच्या कारकिर्दीला उपमा द्यायची तर, पावसाळ्यात अगदी अल्पकाळच आकाशात चमकून अवघी सृष्टी उजळून टाकत क्षणार्धात लुप्त होणाऱ्या विजेच्या लोळाचीच द्यावी लागेल. ४ जून १९६४ ते ११ जानेवारी १९६६ अशी अवघी दीड वर्षांची शास्त्रीजींची पंतप्रधानकीची कारकीर्द विलक्षण घटनामय शाबीत झाली. नवस्वतंत्र देशातील संस्थात्मक रचनेची पायाभरणी करण्याची पंडित नेहरू यांच्या कारकिर्दीत सुरू झालेली प्रक्रिया शास्त्रीजींनी पुढे चालू राखली. चीनने केलेल्या आक्रमणापायी उमेद खच्ची झालेले देशवासी आणि लष्कर यांच्या मनोधैर्याची पुनर्बांधणी साधून १९६५ साली पाकिस्तानने केलेल्या दु:साहसाला शास्त्रीजींनी मूंहतोड जबाब दिला. हरित क्रांतीची पायाभरणी त्यांच्याच काळात सुरू झाली. धवल क्रांतीची मुहूर्तमेढ राष्ट्रीय दुग्धशाळा विकास मंडळाच्या (नॅशनल डेअरी डेव्हलपमेन्ट बोर्ड) रूपाने रचली गेली ती त्यांच्याच कारकिर्दीदरम्यान. सीमा सुरक्षा दलाची निर्मिती घडवून आणली त्यांनीच. भारतीय अन्न महामंडळ अस्तित्वात आले त्यांच्याच पंतप्रधानकीदरम्यान. कृषी मूल्य निर्धारण आयोग (कमिशन फॉर ॲग्रिकल्चरल कॉस्ट्स् ॲन्ड प्रायसेस) निर्माण करण्याची कल्पना शास्त्रीजींचीच. केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सेन्ट्रल ब्यूरो ऑफ इनव्हेस्टिगेशन - सीबीआय) आणि केंद्रीय दक्षता आयोग (सेन्ट्रल व्हिजिलन्स कमिशन - सीव्हीसी) यांसारख्या संस्थांची निर्मिती घडून आली ती शास्त्रीजींच्याच प्रेरणेने. शास्त्रीजींच्या नावानेच मसुरी येथे स्थापन झालेल्या प्रशासकीय प्रशिक्षण अकादमीचे संचालकपद भूषविलेले संजीव चोप्रा शास्त्रीजींचे चरित्र लिहिण्यास प्रवृत्त का झाले, याचा त्यांनीच या ग्रंथात अगदी सुरुवातीलाच नमूद केलेला प्रसंगही मोठा रोचक आणि तितकाच अंतर्मुख बनविणारा आहे. शास्त्रीजींचे बालपण, शिक्षण, काँग्रेस पक्षात त्यांनी पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाचा स्वत:च्या कार्यकुशलतेद्वारे क्रमाक्रमाने संपादन केलेला विश्वास, काँग्रेस पक्षात सक्रिय बनण्यापूर्वी लाला लजपतराय यांनी स्थापन केलेल्या 'सर्व्हन्ट्स् ऑफ द पीपल सोसायटी'मध्ये त्यांनी व्यतीत केलेली कारकीर्द, पंडित गोविंद वल्लभ पंत यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये मंत्री या नात्याने त्यांनी उत्तर प्रदेशात स्वातंत्र्यपूर्व काळात बजावलेली कामगिरी... अशा शास्त्रीजींच्या कार्यकर्तृत्वाशी संलग्न, त्या मानाने अल्पज्ञात, अनेकानेक तपशीलांनी या ग्रंथाचे अंतरंग समृद्ध बनलेले आहे. ■■

**RNI Regn. No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model colony Post Office Pune,**
**On 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग-व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राकिय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे – ४११ ०३०. येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**